# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक १६/०७/२०२४ चे ठराव**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक – ६२२** **विषय क्रमांक- ६२२**

**दिनांक – १६/०७/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६२२**<br><br>**दिनांक - १६/०७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/वि/चिं-२/कावि/१५/२०२४ दि.०७/०६/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३६२९ दि.०९/०७/२०२४ अन्वये, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले जयंती निमित्त आयोजीत कार्यक्रमाकरीता ध्वनिक्षेपण व प्रकाश व सीसीटीव्ही व्यवस्था करणे, तसेच जनरेटर द्वारे वीजपुरवठा करणेकामी मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ६२२**<br><br>**दिनांक - १६/०७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/वि/चिं-२/कावि/१५/२०२४ दि.०७/०६/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३६२९ दि.०९/०७/२०२४ अन्वये, प्रस्तुत कामांतर्गत सन २०२४ मधील महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संयुक्त जयंती महोत्सवा निमित्त आयोजीत प्रबोधन पर्व कार्यक्रमा करीता दर वर्षी प्रमाणे पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्या मागील मोकळ्या जागेत आयोजन करणेत आले होते. दर वर्षी होणा-या कार्यक्रमांचे नियोजना नुसार दि.११ एप्रिल ते १५ एप्रिल ह्या कालावधीच्या अनुशंगाने आवश्यक सर्व बाबींचा समावेश करून सदर कार्यक्रमाकरीता तात्पुरत्या स्वरूपात ध्वनिक्षेपण व प्रकाश व सीसीटीव्ही व्यवस्था करणे, तसेच जनरेटर द्वारे वीजपुरवठा करणे कामाचे र.रू.२१,१८,५९२/- इतके अंदाजपत्रक तयार करून र.रू.२४,९९,९३९/- इतकी तांत्रिक मान्यता घेण्यात आली होती. तसेच सदर कामाकरीता महापालिका सभा ठराव क्र.५३८ दि.०६/०२/२०२४ नुसार र.रू.२५,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता घेणेत आलेली आहे. व त्यानुसार र.रू.२१,१८,५९२/- इतक्या रक्कमेची निविदा प्रसिद्ध करून लघुत्तम दराचे मे. मेडीयाटेक सोल्युशन्स यांना २८.५ % कमी दराने कामाचे आदेश देणेत आले आहेत. मनपाचे वतीने कार्यक्रमाचे नियोजना पुर्वी विभागामार्फत निविदा प्रसिद्ध केली असल्याने प्रत्यक्ष कोणते कार्यक्रम होणार आहेत व त्यासाठी कोणती यंत्रणा वापरावी लागणार आहे याबाबत ची पुर्व कल्पना नसल्याने सालाबादप्रमाणे होणा-या कार्यक्रमांचे अनुशंगाने बाबींचा समावेश करून अंदाजपत्रक तयार करणेत आले होते. तथापी ह्या वर्षी खालील बाबींचे कामकाज वाढल्याने सर्व साहित्यांचे संख्या अधिक लागली आहे तसेच प्रसिद्ध गायक अवधुत गुप्ते यांचा विशेष कार्यक्रमाचे आयोजन केल्यामुळे त्याकरीता लागणारा वेगळा सेटअप लावावा लागल्यामुळे सदर महोत्सवाचा खर्च हा मुळ निविदा रक्कमेपेक्षा अधिक झालेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.<br>१) स्थापत्य विभागामार्फत दरवर्षी पेक्षा मोठा डोम प्रकारातील ८० फुट बाय १२० फुट मुख्य मंडप टाकण्यात आला होता तसेच ३० बाय ९० चा लहान पारंपारीक मंडप |

| | |
|---|---|
| | टाकणेत आला होता. त्यामुळे लाईट, फॅन व कुलर ची संख्या वाढलेली आहे.<br>२) कार्यक्रमाचे स्टेज देखील दरवर्षी पेक्षा मोठे ३० बाय ६० फुटाचे करण्यात आले होते. त्यामुळे स्टेज वरील सर्वच विद्युत साहीत्य हे नेहमी पेक्षा अधिक वापरावे लागले आहे.<br>३) दि. १३ एप्रिल २०२४ रोजी सुप्रसिध्द गायक अवधुत गुप्ते यांच्या गाण्यांचा लाईव्ह कॉन्सर्ट आयोजीत केल्याने सदर कार्यक्रमा करीता अत्याधुनिक अशी 6 Way Music System वापरावी लागली आहे. सदर साहीत्याचा खर्च हा इतर साहित्याचे खर्चापेक्षा तिन पटीने अधिक आहे..<br>४) विशेष कार्यक्रमाच्या वीजभारानुसार अधिक क्षमतेचे २५०केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटर द्वारे वीजपुरवठा करावा लागला आहे.<br>सबब सदरचे कामकाज करणे आवश्यक असलेने ते करणेत आलेले आहे. त्यामुळे निविदा रक्कमेपेक्षा र.रू.१२,८६,८४३/- इतका अधिक खर्च झालेला आहे. तथापी मे. मेडीयाटेक सोल्युशन्स यांना २८.५% कमी दराने कामाचे आदेश देणेत आले असल्याने प्रत्यक्ष वाढीव खर्च हा र.रू.९,२०,०९३/- + GST या खर्चास मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक – ६२३** **विषय क्रमांक- ६२३**

**दिनांक – १६/०७/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६२३**<br><br>**दिनांक - १६/०७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/वि/कावि/३८१/२०२४ दि.०७/०६/२०२४ आणि मा.प्रशासक मा.स्थायी समिती यांजकडील मंजूर ठराव क्र.३६३० दि.०९/०७/२०२४ अन्वये, मनपाचे अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.१४ व प्रभाग क्र.१५ मध्ये विद्युत विषयक कामाकरिता कुशल व अर्ध-कुशल कर्मचारी पुरवठा करणे व विद्युत विषयक कामे करणेकामी मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ६२३**<br><br>**दिनांक १६/०७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/वि/कावि/३८१/२०२४ दि.०७/०६/२०२४ आणि मा.प्रशासक मा.स्थायी समिती यांजकडील मंजूर ठराव क्र.३६३० दि. ०९/०७/२०२४ अन्वये, मनपाच्या अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत निगडी प्राधिकरण उपविभागातील आकुर्डी येथील नवीन मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल, शाळा, करसंकलन कार्यालय, ओपीडी दवाखाना, कोर्ट बिल्डिंग व स्ट्रीट लाईट येथे विद्युत संच मांडणीचे काम करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणची विद्युत यंत्रणा अविरतपणे कार्यान्वित राहण्याकरिता अशा या प्रकारचे काम करणारे कुशल व अर्ध-कुशल तांत्रिक कर्मचारी यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. परंतु राज्य शासनाने नवीन नोकर भरतीवर निर्बंध असल्यामुळे महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारचे काम करणारे तांत्रिक मनुष्यबळ यांची संख्या अपुरी आहे. सदर ठिकाणची विद्युत यंत्रणा अविरतपणे कार्यान्वित राहण्याकरिता अशा या प्रकारचे काम करणारे कुशल व अर्ध-कुशल तांत्रिक कर्मचारी यांची नेमणूक ह्या कामामधून करणेत आलेली होती. सदरच्या कामाची मुदत मार्च २०२४ मध्ये संपुष्टात येत आहे. सदर कामाची सन २०२३-२४ ह्या आर्थिक वर्षातील निविदा कार्यवाही पूर्ण करणेत आलेली होती. परंतू भारत सरकार सार्वत्रिक |

| | |
|---|---|
| | लोकसभा २०२४ ची आदर्श आचारसंहिता लागू झाली असल्याने सदर कामाची निविदा उघडण्याची प्रक्रिया करणे शक्य नाही. सदर सार्वत्रिक लोकसभा २०२४ ची आदर्श आचारसंहिता शिथिल होण्याकरिता अंदाजे २ महिने कालावधी लागण्याची शक्यता आहे. तरी वर नमूद केलेल्या आकुर्डी येथील नवीन मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल, ग.दी माडगुळकर नाट्यगृहात, कोर्ट बिल्डिंग व स्ट्रीट लाईट येथे विद्युत यंत्रणा अविरतपणे कार्यान्वित राहण्याकरिता कुशल व अर्ध-कुशल तांत्रिक कर्मचारी नेमणूक करणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत अशा प्रकारचे मनुष्यबळ पुरवठा करण्याचे कोणतेही काम इकडील विभागाकडे सुरु नाही. त्यामुळे सदर कामाकरिता पुढील २ महिन्याकरिता येणारा खर्च मूळ निविदेच्या रक्कमेच्या मध्ये समावेश करून सुधारित निविदा करणे आवश्यक आहे. सदर कामाचा खर्च निविदा रक्कमेपेक्षा वाढीव होत आहे. सदर खर्चास मा.स्थायी समिती सभेची मंजुरी मिळाल्यानंतर अतिरिक्त खर्चाचा करारनामा करण्यात येणार आहे. तसेच सदर कामाची सुधारित निविदा रक्कम ही प्रशासकीय रक्कमेच्या अतिरिक्त होत असून सुधारित प्रशासकीय रक्कमेस मान्यता देणे आवश्यक आहे.<br><br><table><tr><td>अंदाजपत्रकीय र.रु</td><td>सुधारित अंदाजपत्रकीय र.रु.</td><td>मूळ निविदा र.रु</td><td>अतिरिक्त वाढीव र.रु खर्च</td><td>सुधारित निविदा र.रु</td></tr><tr><td>३०,००,०००/-</td><td>४०,००,०००/-</td><td>२३,०६,३६४/-</td><td>१०,१४,४८६/-</td><td>३३,२०,८५०/-</td></tr></table><br>सदरच्या कामाकरिता सन २०२४ -२५ च्या अंदाजपत्रकामध्ये पानाक ३४९ आणि अनु.क्र २७ येथे ३,००,०००/- इतकी तरदूत करणेत आली आहे. सदर कामाकरिता होणा-या अतिरिक्त खर्चाची तरतुद इकडील विभागाकडून करण्याची दक्षता घेण्यात येईल. सबब सदर निविदा रक्कमे पेक्षा अधिक होणा-या र.रु.१०,१४,४८६/- चे खर्चास व सुधारित खर्च र.रु.४०,००,०००/- इतक्या प्रशासकीय रक्कमेस०९/०७/२०२४ अन्वये मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ६२४** **विषय क्रमांक - ६२४**

**दिनांक - १६/०७/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६२४ दिनांक - १६/०७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/वि/जा/१९२/२०२४ दि.०७/०६/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३६३१ दि.०९/०७/२०२४ अन्वये, मनपाचे प्रभाग क्र.१८ मध्ये अद्यावत स्मशानभूमी बांधणे (विद्युत दाहिनी) अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे या कामास मुदतवाढ तसेच त्यापोटी येणा-या वाढीव खर्चास व प्रशासकीय रक्कमेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मान्यता घेणेकामी शिफारस करणेबाबत. |
| **ठराव क्र. ६२४ दिनांक १६/०७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/वि/जा/१९२/२०२४ दि.०७/०६/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३६३१ दि.०९/०७/२०२४ अन्वये, चिंचवड उपविभागांतर्गत उपरोक्त विषयांकित काम नि नो. क्र. ४४/१०/२०२०-२०२१, आदेश क्र.विमुका/५/कावि/३६२/२०२१ दि.२१/५/२०२१ नुसार |

मे.कल्याणी इंटरप्राईजेस यांना देणेत आले आहे. कामाची मुदत १८ महिने आहे. सदर कामाची प्रशासकीय मान्यता र.रू.१.५० कोटी इतकी असून निविदा र.रु.१,३१,२९,५०८/- इतकी आहे. त्याचा निविदा दर ९.१% कमी असून ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेण्यास ठराव क्र. ९४४७ दि.१२/०५/२०२१ अन्वये मान्यता मिळालेली आहे.सदर कामांस मा. आयुक्त यांच्या दि.१८/११/२२ च्या प्रस्तावानुसार प्रथम मुदतवाढीस दि.२१/०१/२०२४ अखेर मान्यता मिळालेली आहे. सदर चिंचवड स्मशानभूमीमध्ये जनरेटर, ट्रान्सफॉर्मरचे वाढीव क्षमतेमुळे रक्कम रुपये १३,६७,८८५/- ची वाढ झाली आहे व निविदेमध्ये १२ % जीएसटी घेण्यात आलेली आहे. परंतु नवीन जीएसटी धोरणानुसार १८ टक्के जीएसटी म्हणजेच वाढीव ६ टक्के जीएसटी अदा केल्यामुळे निविदा रक्कमेच्या मर्यादेपर्यंत खर्च झाला आहे. त्यामुळे मूळ कामातील विद्युत दाहिनीच्या चालनाचे काम १२ महिने ऐवजी ८ महिने पर्यंत करणेत आले आहे. उपरोक्त ठिकाणी एकच विद्युत दाहिनी असलेने त्याचे वार्षिक चालन देखभाल दुरूस्ती (सर्वसमावेशक) साठी Rate Analysis तयार करणे आवश्यक आहे. त्याचे कोटेशन मागविणेत आले असून सद्यस्थितीत लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता चालू असून, आचारसंहिता संपलेनंतर नविन लघुनिविदा प्रसिध्द करून सदर विद्युत दाहिनीचे चालन देखभाल दुरूस्तीचे काम काढण्यात येईल. या निविदा प्रक्रिया होणेस २ ते ३ महिन्याचा कालावधी लागणार आहे. निविदा प्रक्रियेस लागणारा कालावधी विचारात घेता मूळ कामास दिनांक २१/९/२४ पर्यंत म्हणजेच आठ महिने कालावधीसाठी मुदतवाढ मिळणे आवश्यक आहे. सदर कामाचे विद्युत दाहिनी चालनासाठी सुधारीत अंदाजपत्रक तयार केले असता त्यास र.रू.१७,४३,२४७/- इतका खर्च अपेक्षित आहे. विषयांकीत कामांस ८ महिने मुदतवाढ व त्यापोटी येणारा वाढीव खर्च (मूळ निविदा खर्च र.रु.१,४७,०५,०४९/- अधिक वाढीव खर्च र.रु.१७,४३,२४७/- असा एकूण खर्च र.रु.१,६४,४८,२९६/- ) इतका तांत्रिक मान्यता खर्च अपेक्षित आहे. व त्यासाठी प्रशासकीय मान्यता र.रू.१,७०,००,०००/- या खर्चास. मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाचे आदेश | मुळ कालावधी | एकुण कालावधी | मुदतवाढीचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्र. क्र. १८ मध्ये अद्यावत स्मशानभूमी बांधणे (विद्युत दाहिनी) अंतर्गत विद्युत विषय कामे करणे) | वि/मुका/५/कावि/ ३६२/ २०२१ दि.२१/५/२०२१ | दि.२१/०५/२०२१ ते दि.२०/११/२०२२ | १८ महिने | |
| २ | प्रथम मुदतवाढ | वि/मुका/५/कावि/ ३६२/ २०२१ दि.२१/५/२०२१ | दि.२१/११/२०२२ ते दि.२१/०१/२०२४ | १४ महिने | स्थापत्य विषयक काम उशीरा पूर्ण झालेमुळे व विद्युत दाहिनी १२ महिने चालन करणेसाठी |
| ३ | द्वितीय मुदतवाढ | | दि.२२/०१/२४ ते दि.२१/०७/२४ | ६ महिने | चिंचवड स्मशानभूमी मध्ये जनरेटर, ट्रान्सफॉर्मरचे वाढीव क्षमतेमुळे र. रु. १३,६७,८८५/- ची वाढ झाली आहे व निविदेमध्ये १२ % जीएसटी घेण्यात आलेली आहे. परंतु नवीन जीएसटी धोरणानुसार १८ टक्के जीएसटी म्हणजेच वाढीव ६ टक्के जीएसटी अदा केल्यामुळे निविदा रक्कमेच्या मर्यादेपर्यंत खर्च झाला आहे. त्यामुळे मूळ कामातील विद्युत दाहिनीच्या चालनाचे काम १२ महिने ऐवजी ८ महिने पर्यंत करावे लागले. सद्यस्थितीत लोकसभा निवडणूक आचार संहिता चालू असल्याने नविन निविदा कार्यवाही होईपर्यंत म्हणजेच पुढील ८ महिने मुदतवाढ घेणे आवश्यक. |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६२५** **विषय क्रमांक- ६२५**

**दिनांक १६/०७/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **ठराव क्र. ६२५**<br>**दिनांक १६/०७/२०२४** | मा.महापालिका मा.अति.आयुक्त (१), बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण यांचेकडील पत्र क्र.बीपी/कावि/रावेत/३४०/२०२४दि.१०/०६/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३६३५ दि.०९/०७/२०२४ अन्वये, सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पातील बांधकाम परवानगी कार्यालयातील तरतुदी मध्ये वाढ/ घट करणेस मान्यता देणेबाबत. |

**ठराव क्र. ६२५**

**दिनांक**

**१६/०७/२०२४**

मा.महापालिका मा.अति.आयुक्त(१), बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण यांचेकडील पत्र क्र.बीपी/कावि/रावेत/३४०/२०२४दि.१०/०६/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३६३५ दि.०९/०७/२०२४ अन्वये, मौजे रावेत येथील स.नं. ७६/१/३ मधील भूखंडावर भूखंड क्र. ए-१२ करीता बांधकाम परवानगी देण्यात आली होती. तसेच सदरचा भूखंड मंजूर रेखांकनामधील असल्याने UDCPR मधील कलम क्र. ३.४.१.(अ) चे तरतुदीनुसार Open Space १८८१.३६ चौ.मी. एवढी सोडण्यात आली आहे. त्यामुळे बांधकाम परवानगी देत असताना ०.७५ ऐवजी १.१ Basic FSI घेत असताना प्रशमन शुल्का पोटी जमीनीच्या शिघ्र गणकाच्या १०% इतकी रक्कम भरणेची आवश्यकता नव्हती तथापि सौ.सुरेखा यादव यांनी सदरची १०% रक्कम म्हणजे र.रु.४,९४,५५८.७५ एवढी रक्कम मनपा कोषागारात भरलेली आहे. त्यामुळे सदरची रक्कम परत करणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिली असुन याबाबतचा आदेश मा.शहर अभियंता यांनी पारीत केलेला आहे.

सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पातील २६०२०-०९ UDCPR-2020 प्रिमीयम चार्जेस या लेखाशिर्षावरील तरतुद नसल्यामुळे सदरची रक्कम अर्जदारास अदा करता येत नाही. तरी २८०६०-०४ ग्रीन बिल्डींग इमारत प्रमोशन परतावा या लेखाशिर्षावर बांधकाम परवानगी विभागातील इतर लेखाशिर्षावरुन तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. सबब क क्षेत्रीय कार्यालयातील सन 2023-24 च्या सुधारीत व सन 2024-25 च्या मुळ अंदाजपत्रकातील कामांच्या तरतुदी मध्ये खालील प्रमाणे वाढ/ घट करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रभाग क्र | सन 2024-25 चे | | लेखाशिर्ष | सन 2024-25ची मुळ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन 2024-25 साठी एकूण सुधारीत तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पा.क्र | अ.क्र | | | | | |
| १ | UDCPR-2020 प्रिमीयम | १६ | ९० | | महसुली | ०.०० | ५,००,०००/- | ०.०० | ५,००,०००/- |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | चार्जेस | | | | | | | | |
| २ | ग्रीन बिल्डींग इमारत प्रमोशन परतावा | १६ | ९० | १४ | महसुली | ३,००,००,०००/- | ०.०० | ५,००,०००/- | २,९५,००,०००/- |
| | एकूण | | | | | | ५,००,०००/- | ५,००,०००/- | |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६२६**
**दिनांक – १६/०७/२०२४**

**विषय क्रमांक- ६२६**
**खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र ६२६**<br><br>**दिनांक १६/०७/२०२४** | मा.महापालिका मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. हक्षेका/वि/कावि/२१५/२०२४ दि. ०४/ ०७/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३६६८ दि.०९/०७/२०२४ अन्वये, सांगवी स्मशानभुमी येथील गॅस शव दाहिनीची १ वर्षाकरिता चालन व देखभाल दुरुस्ती करणे (सन २०२४-२५ ) या कामाला प्रशासकीय मान्यता व अंदाजपत्रकात समावेश करुन तरतुद करणेस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ६२६ दिनांक– १६/०७/२०२४** | मा.महापालिका मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. हक्षेका/वि/कावि/२१५/२०२४ दि. ०४/ ०७/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३६६८ दि.०९/०७/२०२४ अन्वये, विषयांकित ठिकाणचे देखभाल दुरुस्तीचे काम मे. एन सी वाय एंटरप्रायजेस यांना दि.१५/०९/२०२३ ते दि.१४/०९/२०२४ पर्यंत देणेत आलेले आहे. सदरचे काम दि. १४/०९/२०२४ रोजी संपुष्ठात येणार आहे. सदर एजन्सीस दि. १५/०६/ २०२४ अखेर र.रु. ३०,९२,४२३/- इतके बिल अदा करणेत आलेले आहे व उर्वरित र.रु. २८,३४,०००/- दि. १४/०९/२०२४ अखेर अदा करणे बाकी आहे. सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकामध्ये ह क्षेत्रिय कार्यालयामधील चालु देखभाल दुरुस्ती व चालु भांडवली कामांना पुरेशी तरतुद ठेवल्यामुळे सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकामध्ये नियोजित कामांना पुरेशी तरतुद उपलब्ध न झाल्याने विषयांकित कामाकरिता टोकन र.रु. १०००/- ठेवणेत आली होती. सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकातील सुचविणेत आलेले र.रु. १०००/- चे काम वगळणेत आलेले आहे. ह क्षेत्रिय विद्युत विभागामार्फत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये कोणत्याही प्रकारचे नियोजित भांडवली कामाचा समावेश करणेत आलेला नाही. विषयांकित कामांचा सन २०२४-२५ मध्ये मुख्य कार्यालय देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षाअंतर्गत प्रशासकीय मान्यता व अंदाजपत्रकात समावेश करुन तरतुद करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अ. क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नांव | लेखाशिर्ष नांव | अंदाजपत्रक पानांक व अ.क्र. | बजेट कोड | अंदाजपत्रकीय रक्कम | उपलब्ध तरतूद र.रु. | तरतूद वाढ र.रु | तरतूद घट र.रु | सुधारित तरतुद रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र. २५ पुनावळे मधील नव्याने विकसित होणा-या डी पी रस्त्यावर विद्युत विषयक कामे करणे. (चालु काम) | मुख्यालय विद्युत – सार्वजनिक सुरक्षितता | २९०/ २५ | 2223 05825 | 100000000 | 5000000 | 0 | 1600000 | 3400000 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | सांगवी स्मशानभुमी येथील गॅस शव दाहिनीची १ वर्षाकरिता चालन व देखभाल दुरुस्ती करणे. (सन २०२४-२५ ) | मुख्यालय विद्युत - महसुली कामे | नव्याने समावेश | नव्याने समावेश | 6000000 | 0 | 1600000 | 0 | 1600000 |
| | **एकुण र.रु.** | | | | **106000000** | **5000000** | **1600000** | **1600000** | **5000000** |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-६२७** **विषय क्रमांक- ६२७**
**दिनांक – १६/०७/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र.६२७ दिनांक – १६/०७/२०२४** | मा.महापालिका मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. फक्षेका/वि/कावि/०२/३२६/२०२४ दि. ०४/०७/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३६७१ दि.०९/०७/२०२४ अन्वये मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत रुपीनगर तळवडे येथील महापारेषण कंपनीचा २२० केव्ही मनोरा क्र. ३४ स्थलांतरीत करणे या कामाचा सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकात नव्याने समावेश करुन प्रशासकीय मान्यता मिळणे तसेच कामास तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ६२७ दिनांक – १६/०७/२०२४** | मा.महापालिका मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. फक्षेका/वि/कावि/०२/३२६/२०२४ दि. ०४/०७/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३६७१ दि.०९/०७/२०२४ अन्वये, महापारेषण कंपनीची रुपीनगर तळवडे येथील २२० केव्ही चिंचवड चाकण / टेल्को लाईन ची उच्चदाब उपस्कर वाहिनी मोरेवस्ती चिखली या भागातून वीज वहन करते. सदर वाहिनीच्या मनोरा क्र. ३४ च्या मध्य भागातून मनो-याखालून अत्यंत धोकादायक पद्धतीने वाहनांची ये-जा चालू असते ही वाहने मनो-यास धडकून अपघात होऊन वीजपुरवठा खंडीत होण्याची शक्यता आहे तसेच भविष्यात वाहिनी पासून वाहनांचे सुरक्षित अंतर न राखले गेल्याने गंभीर अपघाताची तसेच जीवीत व वित्त हानी होण्याची शक्यता आहे. सदर रस्ता वाहतुकीस बंद करणेची मागणी म.रा.वि.पा.कं. तसेच माजी नगरसदस्य यांनी वेळोवेळी केलेली आहे. उपरोक्त कामाचे तात्पुरते अंदाजपत्रक महापारेषण कं. कडून म.न.पा.स प्राप्त झालेले असून त्या अनुषंगाने मनपामार्फत सदर मनोरा स्थलांतरीत करणेच्या कामास अंदाजे र रु. १० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. परंतु सदर कामाचा सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात समावेश नसल्याने मनपा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात समावेश करून तरतूद वर्ग करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे |

| अ. क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नांव | लेखा शिर्ष नांव | अंदाजपत्रक पानांक | बजेट कोड | अंदाजपत्रकीय रक्कम | उपलब्ध तरतूद र.रु. | तरतूद वाढ र.रु | तरतूद घट र.रु | सुधारित तरतुद रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **व अ.क्र .** | | | | | | |
| १ | मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत रुपीनगर तळवडे येथील महापारेषण कंपनीचा २२० केव्ही मनोरा क्र. ३४ स्थलांतरीत करणे. | स्थापत्य प्रकल्प | नव्याने समावेश | नव्याने समावेश | १०००००००० | ० | २५०००००० | ० | २५०००००० |
| २ | म.रा.वि.वि.कं./ महापारेषण/त्रयस्थ संस्थांकरीता सुपरव्हिजन चार्जेस व विद्युत निरीक्षण | महसूली खर्च | ३५/ २८ | | | ४००००००० | ० | २५०००००० | १५०००००० |
| | **एकुण** | | | | १०००००००० | ४००००००० | २५०००००० | २५०००००० | ४००००००० |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ६२८** **विषय क्रमांक- ६२८**
**दिनांक – १६/०७/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६२८ दिनांक - १६/०७/२०२४** | मा.महापालिका मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. हक्षेका/वि/कावि/०२१४/२०२४ दि.२८/०६/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३६७२ दि.०९/०७/२०२४ अन्वये, ह क्षेत्रिय कार्यालय, विद्युत विभागातील नियोजित देखभाल दुरुस्ती विषयक कामांचा नव्याने सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात समावेश करुन वर्गीकरणासह प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ६२८ दिनांक – १६/०७/२०२४** | मा.महापालिका मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. हक्षेका/वि/कावि/०२१४/२०२४ दि. २८/०६/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३६७२ दि.०९/०७/२०२४ अन्वये“ह” क्षेत्रिय कार्यालय, विद्युत विभागातील सन २०२४-२५ मधील देखभाल दुरुस्ती विषयक नियोजित कामे सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकात उपलब्ध तरतुदीनुसार प्रत्येकी र.रु. १०००/- इतकी अंदाजे रक्कम ठेवुन समाविष्ट केलेले होते. परंतु लेखाविभागाकडुन प्रत्येकी र.रु. १०००/- तरतुद असलेली कामांची नावे अंदाजपत्रकामधुन वगळणेत आलेली आहेत. सद्यस्थितीत ह क्षेत्रिय कार्यालय, विद्युत विभागाकडे देखभाल दुरुस्तीची सन २०२४-२५ मधील अत्यावश्यक कामे करणे करिता निविदा मागविणे आवश्यक आहे. सदर कामाचा सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात समावेश नसल्याने अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात २०२४-२५ मध्ये समावेश करणे आवश्यक आहे. त्याकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अ. क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नांव | लेखाशिर्ष नांव | अंदाजपत्रक पानांक व अ.क्र. | बजेट कोड | अंदाजपत्रकीय रक्कम | उपलब्ध तरतूद र.रु. | तरतूद वाढ र.रु | तरतूद घट र.रु | सुधारित तरतुद रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सांगवी - बोपोडी मुळा नदीवर नवीन पुलावर प्रकाश व्यवस्था व विद्युत विषयक कामे करणे. | मुख्यालय – स्थापत्य प्रकल्प अंतर्गत विद्यत विषयक कामे करणे | 319/ 09 | 2425 01969 | 50000000 | 2000000 | 0 | 2000000 | 0 |
| 2 | दापोडी हुतात्मा भगतसिंग शाळा इमारतीचे विस्तारीकरण करणे (विद्युत विषयक काम करणे.) | मुख्यालय – स्थापत्य प्रकल्प अंतर्गत विद्यत विषयक कामे करणे | 318/ 122 | 2324 02913 | 50000000 | 1500000 | 0 | 1000000 | 500000 |
| 3 | प्रभाग क्र. २५ पुनावळे मधील नव्याने विकसित होणा-या डी पी रस्त्यावर विद्युत विषयक कामे करणे. (चालु काम) | मुख्यालय विद्युत – सार्वजनिक सुरक्षितता | 290/ 25 | 2223 05825 | 100000000 | 5000000 | 0 | 2550000 | 2450000 |
| 4 | वाय.सी.एम.एच. रुग्णालयामधील VRV /HVAC/ Split AC वातानुकुलीत यंत्रणेची चालन व देखभाल दुरुस्ती करणे. (सन २०२४-२५) | मुख्यालय-महसुली कामे | नव्याने समावेश | नव्याने समावेश | 5500000 | 0 | 1400000 | 0 | 1400000 |
| 5 | वाय.सी.एम.एच. रुग्णालयामधील १०१० KVA जनित्र संचाची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. (सन २०२४-२५) | मुख्यालय-महसुली कामे | नव्याने समावेश | नव्याने समावेश | 1600000 | 0 | 400000 | 0 | 400000 |
| 6 | वाय.सी.एम.एच.येथील विद्युत विषयक चालन देखभाल दुरुस्ती व तांत्रिक दोष निवारणाकरिता अर्ध कुशल व अकुशल कर्मचाऱ्यांची नेमणुक करणे. (सन २०२४-२५) | मुख्यालय-महसुली कामे | नव्याने समावेश | नव्याने समावेश | 2500000 | 0 | 625000 | 0 | 625000 |
| 7 | वाय.सी.एम.एच. रुग्णालयामध्ये एशियन उत्पादीत लिफ्टची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. (सन २०२४-२५) | मुख्यालय-महसुली कामे | नव्याने समावेश | नव्याने समावेश | 1000000 | 0 | 225000 | 0 | 250000 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | वाय. सी. एम. एच. मधील विद्युत उपकेंद्र व विद्युत विषयक यंत्रणेचे वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.(सन २०२४-२५) | मुख्यालय-महसुली कामे | नव्याने समावेश | नव्याने समावेश | 3000000 | 0 | 750000 | 0 | 750000 |
| 9 | वाय.सी.एम. रुग्णालया मधील पाणीपुरवठा करणा-या विद्युत पंपाची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. (सन २०२४-२५) | मुख्यालय-महसुली कामे | नव्याने समावेश | नव्याने समावेश | 2000000 | 0 | 500000 | 0 | 500000 |
| 10 | वाय.सी.एम. रुग्णालया मधील पाणीपुरवठा व अग्निशामक यंत्रणेच्या चालन देखभाल दुरुस्ती करिता अर्धकुशल व अकुशल कर्मचाऱ्यांची नेमणुक करणे. (सन २०२४-२५) | मुख्यालय-महसुली कामे | नव्याने समावेश | नव्याने समावेश | 2500000 | 0 | 625000 | 0 | 625000 |
| 11 | वाय.सी.एम.एच. अंतर्गत दूरध्वनी/ ई.पी.ए.बी.एक्स यंत्रणेची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. (सन २०२४-२५) | मुख्यालय-महसुली कामे | नव्याने समावेश | नव्याने समावेश | 1200000 | 0 | 400000 | 0 | 400000 |
| 12 | वाय सी एम एच रुग्णालयामधील UPS (320KVA) यंत्रणेची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे व नविन बॅटरी बसविणे.(सन २०२४-२५) | मुख्यालय-महसुली कामे | नव्याने समावेश | नव्याने समावेश | 2500000 | 0 | 625000 | 0 | 625000 |
| | | | | **एकुण र.रु.** | **221800000** | **8500000** | **5550000** | **5550000** | **8500000** |

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६२९** **विषय क्रमांक- ६२९**

**दिनांक – १६ /७/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६२९**<br>**दिनांक –**<br>**१६ /७/२०२४** | मा.महापालिका मा. आयुक्त, लेखा यांचेकडील पत्र क्र. लेखा/१३/कावि/१०७/२०२४ दि.२७/०६/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३६९३ **दि.०९ /७/२०२४** अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विकास प्रकल्प योजनेसाठी आवश्यक हरित कर्ज/कर्जरोखे (Green Bond) उभारणेस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ६२९**<br>**दिनांक –**<br>**१६ /७/२०२४** | मा.महापालिका मा. आयुक्त, लेखा यांचेकडील पत्र क्र. लेखा/१३/कावि/१०७/२०२४ दि.२७/०६/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांजकडील ठराव क्र.३६९३ **दि.०९ /७/२०२४** अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहर विकासाच्या अनुषंगाने पर्यावरण किंवा हवामानासाठी सकारात्मक योगदान देणा-या प्रकल्पांसाठी ग्रीन बॉण्ड्स जारी करण्याचे नियोजित आहे. याकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यास किंवा पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या दृष्टिकोनातून हरित रोख्यांमध्ये (Green Bond) समावेश असणा-या प्रकल्पांसाठी वित्तपुरवठा म्हणजेच मोठ्या प्रमाणावर निधी उभारणे आवश्यक आहे. यामध्ये शहरातील नॉन-मोटाराइज्ड ट्रान्सपोर्टेशन आणि इतर हरित प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देण्याकरिता ₹ २०० कोटी (ग्रीन शू पर्याय म्हणजे आयपीओ नंतर शेअरची मागणी वाढल्यास स्टॉकच्या किमतीला स्थिरता मिळवून देण्याचा उद्देश असलेल्या पर्यायासह) उभे करण्याचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत प्रस्ताव आहे.<br>त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील (१) गवळी माथा ते इंद्रायणी नगर चौक जंक्शन हा टेल्को रस्ता, (२) हरित सेतूचे “ए” वॉर्ड / क्षेत्रिय कार्यालय, निगडी प्राधिकरण (वॉर्ड १५)च्या परिसरातील काम आणि शहरातील नॉन-मोटाराइज्ड ट्रान्सपोर्टेशन आणि महानगरपालिकेला आवश्यक वाटेल त्यानुसार इतर हरित प्रकल्प हाती घेण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने हरित कर्ज/कर्जरोखे उभारण्यासाठी काही मध्यस्थ संस्थांची नेमणूक करणे आवश्यक असल्यामुळे मर्चंट बँकर, क्रेडीट रेटिंग संस्था, डीबेंचर ट्रस्टी, रजिस्ट्रार, लीगल कौन्सिल, डीपॉझिटर, स्टॉक एक्स्चेंज, बँकर इ. संस्थांची नियुक्ती करण्यास मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. २८६०, दि. १६/०१/२०२४ व क्र. ३१७१, दि. २७/०२/२०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. वरीलप्रमाणे नमूद केल्यानुसार विविध हरित प्रकल्पांना निधी देण्याच्या उद्देशाने, महानगरपालिकेचे म्युनिसिपल बॉन्ड्स/महानगरपालिका रोखे जारी करून सिक्युरिटीज ॲन्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (म्युनिसिपल डेट सिक्युरिटीज इश्यू करणे आणि त्यांचे लिस्टिंग) रेग्युलेशन/नियम, २०१५, वेळोवेळी सुधारणा करून (“सेबी आयएलएमडीएस रेग्युलेशन्स/नियम”) एकूण ₹ २०० कोटी पर्यंत (ग्रीन शू पर्यायासह) निधी उभारणे आवश्यक आहे.त्यानुसार, वरील बाबींच्या आधारे महापालिका बॉंड्स जारी करण्यासाठी खालील बाबींस मान्यता मिळणे आवश्यक आहे.<br>१. महानगरपालिकेने हाती घेतलेल्या किंवा महानगरपालिका हाती घेणार असलेल्या विविध हरित प्रकल्पांच्या निधीसाठी ₹ २०० कोटीपर्यंतचे नॉन-कन्व्हर्टिबल ग्रीन म्युनिसिपल बॉन्डस्/ महानगरपालिका हरित रोखे (ग्रीन शू पर्यायासह) (“ग्रीन बॉन्डस्/हरित रोखे”, किंवा “एनसीडीज्”, किंवा “डिबेंचर्स”), खाजगी प्लेसमेंट पद्धतीने महानगरपालिकेद्वारे जारी करण्यास मंजुरी देणे, जे मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंजमध्ये अटी व शर्तींनुसार, सेबी आयएलएमडीएस नियम/रेग्युलेशन्स, सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्टस् (रेग्युलेशन) ॲक्ट.अधिनियम, १९५६, नॉन-कन्व्हर्टिबल सिक्युरिटीज, सिक्युरिटीज्ड डेट इन्स्ट्रुमेंट्स, सिक्युरिटी रिसीट्स, म्युनिसिपल डेट सिक्युरिटीज जारी तसेच लिस्ट करण्यासाठीचे मास्टर (प्रमुख) |

परिपत्रक आणि दि.२२/०५/२०२४ चा कमर्शियल पेपर ज्यावर परिपत्रक क्र.सेबी/एचओ/डीडीएचएस/ पीओडी१/पी/सीआयआर /२०२४/५४ ("सेबी मास्टर/प्रमुख परिपत्रक") असून जे सातत्याने होणा-या प्रकटीकरण क्र. सीआयआर/आयएमडी/डीएफ१/६०/२०१७, दिनांक १९ जून २०१७ आणि परिपत्रक क्र. सेबी/ एचओ/ डीडीएचएस/ सीआयआर/पी/१३४/२०१९, दिनांक १३ नोव्हेंबर २०१९ यांच्यासोबत वाचले जाते, जी या संदर्भात लागू असेल त्यानुसार आणि वेळोवेळी सुधारित केल्यानुसार, तसेच सरकारद्वारे किंवा इतर कोणत्याही नियामक प्राधिकरणाद्वारे जारी केलेले इतर कायदे, नियम, निर्देश, अधिसूचना, परिपत्रके यानुसार असतील.

२. जारी करण्याच्या उद्देशाने, खालील सदस्यांचा समावेश असलेली "बॉन्डस् इश्यू कमिटी" स्थापन करण्यात यावी.

१.आयुक्त
२.अतिरिक्त आयुक्त (२)
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी
४. सह शहर अभियंता

३. उपरोक्त बॉन्ड इश्यू कमिटीला याद्वारे ग्रीन बॉन्ड/हरित रोखे जारी करण्याच्या संदर्भात अटी व शर्ती ठरविण्यासाठी आणि वाटाघाटी करण्यासाठी संयुक्तपणे आणि पृथकपणे/स्वतंत्ररित्या अधिकार देण्यात आले आहेत.ज्यामध्ये रोख्यांचे प्रमाण/रोख्यांची संख्या,वेळ आणि स्वरूप,जारी करण्याची पद्धत आणि कोणत्याही/सर्व एजन्सीची/मध्यस्थ संस्थांची नियुक्ती करणे किंवा नियुक्तींना (पूर्वी केलेल्या) मंजुरी देणे ज्यामध्ये क्रेडिट रेटिंग एजन्सी,रजिस्ट्रार,ट्रस्टी,कायदेशीर सल्लागार,डिपॉझिटरीज,स्टॉक एक्स्चेंज,प्रकल्प सल्लागार इत्यादींचा समावेश असेल, परंतु यांच्यापुरतेच मर्यादित नसेल आणि किमान सदस्यता,ओव्हरसबस्क्रिप्शन (नवीन रोखे बाजारात आल्यानंतर आलेल्या रोख्यापेक्षा मागणी जास्त असण्याची अवस्था) कायम ठेवणे,इश्यूची मुदत वाढविणे, हरित रोखे/ग्रीन बॉन्ड्सजारी करणे आणि/किंवा इश्यू लवकर बंद करणे इत्यादींसारख्या बाबींचा देखील समावेश असेल.

४. बॉन्ड इश्यू कमिटीच्या सदस्यांना याद्वारे पुढील सर्व कृती करण्यासाठी, सर्व आवश्यक कृत्ये/कृती करण्यासाठी, सर्व आवश्यक कागदपत्रे/करारनामे/करार/कृती/साधने/अर्ज आणि त्यांच्या विवेकबुद्धीनुसार आनुषंगिक लेखन, जसे जमेल तसे, आवश्यक आणि इष्ट वाटेल त्यानुसार यावर स्वाक्षरी करण्यासाठी संयुक्तपणे आणि पृथकपणे/स्वतंत्ररित्या अधिकार दिले जातील. इतर गोष्टींबरोबरच, बॉन्ड इश्यू कमिटीला पुढील गोष्टी करण्यासाठी अधिकार दिले जातील:

१. बॉन्ड जारी करण्यामध्ये सहभागी होणा-या कोणत्याही/सर्व एजन्सीची/मध्यस्थ संस्थांच्या नियुक्त्या (पूर्वी केलेल्या) अंतिम करणे आणि त्यांना मंजुरी देणे ज्यामध्ये ग्रीन बॉन्ड्स/ हरित रोख्यांच्या नियत वाटपात अंतर्भूत होणारे सर्व घटक, पतपात्रता निर्धारण करणा-या संस्था, विश्वस्त, रजिस्ट्रार, कायदेशीर कौन्सिल (वकील), डिपॉझिटरीज, स्टॉक एक्स्चेंज, इश्यूसाठी बँकर्स (बँक चालविणा-या व्यक्ती), प्रकल्प सल्लागार, इत्यादींचा समावेश असेल, परंतु यांच्यापुरतेच मर्यादित नसेल. आणि अशा सर्व व्यक्ती/संस्था (एजन्सी) यांना मोबदला देण्याकरिता ज्यामध्ये देण्यात येणारे शुल्क, अडत (कमिशन), दलाली यांचा समावेश होतो त्याविषयी संबंधितांच्या नियुक्ती पत्रात दिलेल्या अटी व शर्तींप्रमाणे परस्पर संमतीने निश्चित करणे;

| | |
|---|---|
| | २. प्रचलित बाजार परिस्थिती आणि लागू कायदे विचारात घेऊन रोखे जारी करण्याची पद्धत, ग्रीन बॉन्ड्स/ हरित रोखे जारी करण्यासंबंधीच्या अटी जसे की मुदत, व्याजाचा दर, इ. निश्चित करणे;<br><br>३. ज्या प्रकल्पांसाठी निधी उभारण्यात येत आहे, त्या प्रकल्पांना मंजुरी देणे;<br><br>४. मुदतपत्रे, ग्रीन बॉन्ड्स/ हरित रोख्यांचे स्वरूप/आराखडा, संरचित देयक यंत्रणा/एस्क्रो यंत्रणा/वॉटरफॉल (राखीव निधी) यंत्रणा/व्याज देयक यंत्रणा/डीएसआरए यंत्रणा तसेच ग्रीन बॉन्ड्स/हरित रोख्यांच्या रचनेसाठी आवश्यक आणि ग्रीन बाँड्स/हरित रोख्यांच्या संबंधात जबाबदा-या वेळेवर पूर्ण करण्यासाठी इतर कोणत्याही शर्ती/यंत्रणा यांची निश्चिती करणे;<br><br>५. ग्रीन बॉन्ड्स/ हरित रोखे जारी करण्यासाठी वित्तीय विवरणे,खुलासा (प्रकटीकरण) दस्तऐवज/प्लेसमेंट मेमोरँडम (नियुक्ती करार)/ऑफर दस्तऐवज आणि इतर कागदपत्रे तयार करणे, त्यांना अंतिम स्वरूप देऊन स्वाक्ष-या करणे आणि आवश्यकतेनुसार सिक्युरिटीज् अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (“सेबी”) आणि स्टॉक एक्स्चेंज तसेच इतर कोणत्याही नियामक प्राधिकरणाकडे ती सादर करणे;<br><br>६. इतर सर्व आवश्यक कागदपत्रे/करारनामे/करारपत्रे/विलेख/सामंजस्य करार/प्रमाणपत्रे/शपथपत्रे/ घोषणापत्रे/हमीपत्रे इ. आणि इतर सर्व आवश्यक दस्तऐवजांची अंमलबजावणी करणे, तसेच संबंधित सर्व कृत्ये, कृती, बाबी आणि गोष्टी करणे. उपरोक्त नमूद केलेल्या सेबी/स्टॉक एक्स्चेंजेस किंवा अन्य कोणत्याही लागू कायदे किंवा नियम यांचे प्रतीक म्हणून यासंदर्भात असणा-या सर्व औपचारिकतांचे प्रसंगानुरूप किंवा ग्रीन बॉन्डस्/हरित रोखे जारी करताना किंवा त्यांचे नियतवाटप करताना पालन करणे;<br><br>७. प्राप्त करण्यात येणा-या किंवा ओळखल्या जाणा-या/निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्ते(त्तां) वर शुल्क देऊ करण्यासाठी किंवा कर्जरोखे विश्वस्त/बॉन्ड/रोखेधारका यांच्या नावे बॉन्ड जारी करण्यासंदर्भात किंवा महानगरपालिकेच्या इतर कोणत्याही सिक्युरिटी/मालमत्तेच्या संदर्भात तयार केलेल्या खात्यांवर शुल्क आकारण्यासाठी किंवा आणि लागू असेल त्यानुसार महानगरपालिकेच्या वतीने रजिस्ट्री, सीईआरएसएआय (CERSAI), इत्यादींकडे अशा शुल्काच्या नोंदणीसाठी सिक्युरिटीची कागदपत्रे/करार, बॉन्ड ट्रस्ट डीड आणि इतर दस्तऐवज यांची अंमलबजावणी करणे.<br><br>८. महानगरपालिकेच्या स्थावर किंवा जंगम मालमत्ता, चालू किंवा स्थिर मालमत्ता, मूर्त किंवा अमूर्त मालमत्ता, बुक डेट ज्याला खाती प्राप्य म्हणून देखील ओळखले जाते (कंपनीला त्याच्या ग्राहकांकडून किंवा क्लायंटकडून देय असलेल्या रकमा आणि/किंवा वर्तमान व भविष्यातील असतील तेवढे महानगरपालिकेचे दावे या सर्वांवर किंवा त्यापैकी कोणत्याही भागावर असे गहाणवट, शुल्क, तारण किंवा बोजा तयार करण्यासाठी, वेळोवेळी आवश्यक असेल त्याप्रमाणे अशा कर्जरोखेधारक/जारी करणा-या व्यक्तीचे सुरक्षित धनको यांना देऊ केलेल्या इन्स्ट्रुमेंट(दस्तऐवजा)च्या अटींनुसार, त्यांच्याकडून घेतलेल्या सर्व रकमा व्याज, खर्च, शुल्क आणि इतर आनुषंगिक खर्च यांच्यासह सुरक्षित करण्यासाठी आणि सर्व सिक्युरिटी (तारण) दस्तऐवज आवश्यक प्राधिकरणा(णां)कडे नोंदविण्यासाठी आणि सर्व आवश्यक फाइलिंग करण्यासाठी आणि लागू असेल त्यानुसार आवश्यक असल्यास अशा सुरक्षिततेच्या परिपूर्णतेकरिता अहवाल देण्यासाठी अशा कर्जरोखेधारकांच्या/सुरक्षित धनकोंच्या नावे शुल्क आकारण्यासाठी; आणि<br><br>९. नॅशनल म्युनिसिपल अकाउंट्स मॅन्युअल/राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियमावलीनुसार किंवा |

| | |
|---|---|
| | राज्य सरकारने स्वीकारलेल्या तत्सम म्युनिसिपल अकाउंट्स मॅन्युअल/ महानगरपालिका लेखा नियमावलीनुसार आणि त्यातील तयार केलेल्या नियमांनुसार ग्रीन बॉन्ड्स/हरित रोखे जारी करण्यासाठीच्या खुलासा (प्रकटीकरण) दस्तऐवज/नियुक्ती करार/ऑफर दस्तऐवज यांनुसार वित्तीय विवरणे/सुधारित वित्तीय विवरणे मंजूर करणे;<br><br>१०. ग्रीन बॉन्ड्स/हरित रोख्यांकरिता सदस्यता म्हणून प्राप्त होणारी अर्जाची रक्कम स्वीकारणे, नियतवाटप कशाच्या आधारे करायचे याचा निर्णय घेऊन ग्रीन बॉन्ड्स/हरित रोख्यांच्या वाटपास मंजुरी देणे व त्यांचे नियतवाटप करणे;<br><br>११. संबंधित प्राधिकरण/ नियामक संस्था/ मंडळ यांचेकडून आवश्यक त्या सर्व मंजुरी मिळविण्यासाठी अर्ज करणे व पाठपुरावा करणे. जसे, अर्जाचे लिस्टिंग आणि स्टॉक एक्सचेंजेस सोबत म्हणजेच बीएसई लिमिटेड किंवा नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड सोबत–लिस्टिंगचा करार अमलात आणणे, ग्रीन बॉन्ड्स/हरित रोख्यांच्या लिस्टिंगकरिता, नॅशनल सिक्युरिटीज् डिपॉझिटरी लिमिटेड (“एनएसडीएल”)चे रजिस्ट्रार आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (“सीडीएसएल”) यांचेसोबत ग्रीन बॉन्ड्सच्या डीमटेरियलायझेशनसाठीच्या कराराची/करारांची अंमलबजावणी करणे, तसेच ग्रीन बॉन्ड्स/हरित रोखे जारी करण्यासंबंधी महानगरपालिकेच्या वतीने कोणत्याही वैधानिक प्राधिकरणाद्वारे आवश्यक अशा लागणा-या इतर कागदपत्रांची/करारनाम्यांची अंमलबजावणी करणे;<br><br>१२. ग्रीन बॉन्ड्स/हरित रोख्यांच्या सदस्यतेकरिता अर्जाची रक्कम संकलित करण्यासाठी एका किंवा अधिक<br><br>बँक कर्मचा-याची/कर्मचा-यांची नियुक्ती करणे;<br><br>१३. बँकेमध्ये इश्यूकरिता एक किंवा अधिक धारणाधिकार नसलेली एस्क्रो करंट खाती उघडणे आणि ती इश्यूमधील गुंतवणूकदारांकडून प्राप्त झालेली इश्यूची रक्कम पाठविण्याकरिता तसेच स्ट्रक्चर्ड पेमेंट मेकॅनिझम (संरचित देयक यंत्रणा)/एस्क्रो मेकॅनिझम/वॉटरफॉल मेकॅनिझम (रेखीय, कठोर प्रकल्प व्यवस्थापन प्रणालीची यंत्रणा)/सिंकिंग फंड मेकॅनिझम (राखीव निधी यंत्रणा)/इंटरेस्ट पेमेंट मेकॅनिझम (व्याज देय यंत्रणा)/डीएसआरए मेकॅनिझम किंवा इतर कोणत्याही अटी/यंत्रणेच्या चालनाकरिता जी रोख्यांच्या/ बॉन्डच्या दायित्वांची वेळेवर परतफेड करण्याकरिता आवश्यक असेल.<br><br>१४. मास्टर क्रिएशन फॉर्म, कॉर्पोरेट ॲक्शन फॉर्म आणि बॉन्ड्सच्या डीमटेरियलायझेशनसाठी एनएसडीएल व सीडीएसएल तसेच रजिस्ट्रारकडे आवश्यक ती/ते कागदपत्रे/करार तयार करणे, त्यावर स्वाक्षरी करणे, ती फाइल करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे;<br><br>१५. संबंधित नियामक/वैधानिक मुद्दयांच्या पूर्ततेसाठी आणि डीमॅट खात्यात नियतवाटप/बॉन्ड (रोखे) प्रमाणपत्रे / पतपत्रे जमा न होणे, परतावा आदेश, व्याज हमी पत्र/इंटरेस्ट वॉरंट न मिळणे यासारख्या जारी करण्यापूर्वीच्या/केल्यानंतरच्या गुंतवणूकदारांच्या समस्या/तक्रारींचे निवारण करण्यासाठी अनुपालन अधिका-याची नियुक्ती करणे; |

| | |
|---|---|
| | १६.डीमॅट सुविधांतर्गत ग्रीन बॉन्ड्स/हरित रोख्यांचे नियतवाटप करणे आणि एनएसडीएल/सीडीएसएल, रजिस्ट्रार व हस्तांतरण प्रतिनिधी / ट्रान्सफर एजंट यांच्याशी यासंबंधीचे आवश्यक करार करून डीमॅट सुविधा पुरविणे;<br><br>१७. प्रस्तावित ग्रीन बॉन्ड्स/हरित रोखे जारी करणे, त्यांचे डीमटेरियलायझेशन आणि त्यांचे लिस्टिंग करण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे महानगरपालिकेचा शिक्का/मुद्रा (सील) लावणे;<br><br>१८. लागू अधिनियम, कायदे व नियमांनुसार मुद्रांक शुल्क भरणे;<br><br>१९. जारीकर्त्याद्वारे प्रस्तावित ग्रीन बॉन्ड्स/हरित रोख्यांच्या इश्यू(इश्यूं)/ जारी करण्याशी संबंधित इतर<br><br>कोणत्याही बाबींवर निर्णय घेणे आणि/किंवा कार्यवाही करणे.<br><br>उपरोक्त नमूद तपशिलाप्रमाणे महापालिकेचे हरित कर्ज/कर्जरोखे उभारणेकामी उपरोक्त प्रस्तावित सर्व बाबींसह याकामी येणा-या खर्चास त्यास मा. महापालिका सभेची प्रशासकिय मान्यता मिळणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६३०**
**दिनांक – १६ /७/२०२४**

**विषय क्रमांक ६३०**
**खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६३०**<br>**दिनांक –**<br>**१६/७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. माध्य/ शि/५/कावि/२७९/२०२४ दिनांक १५/०७/२०२४ अन्वये, आयटीच संस्थेमार्फत उच्च प्राथमिक इयता ८ वी व माध्यमिक इयता ९ वी १० वी ची इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करणेबाबत. |
| **ठराव क्र. ६३०**<br>**दिनांक**<br>**१६/७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. माध्य/ शि/५/कावि/२७९/२०२४ दिनांक १५/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लोकमान्य टिळक विदयामंदिर फुगेवाडी येथील नवीन इमारतीमध्ये आयटीच या संस्थेद्वारे उच्च प्राथमिक इयता ८ वी व माध्यमिक इयता ९ वी १० वी ची इंग्रजी शाळा सुरु करणेबाबत प्रस्ताव दिनांक १५/०१/२०२४, दिनांक |

| | |
|---|---|
| | १८/०६/२०२४ व दिनांक ०१/०७/२०२४ च्या प्रस्तावान्वये आयटीच संस्थेने दिलेला आहे.<br><br>त्या नुसार आयटीच संस्था इंग्रजी माध्यमाची उच्च प्राथमिक इयता ८ वी व माध्यमिक इयता ९ वी १० वी शाळा चालविण्याची पूर्ण जबाबदारी घेणार आहे. यामध्ये शाळेचे रोजचे संचलन, स्कूल लीडर( मुख्याध्यापक) निवड, शिक्षक निवड, शिक्षक प्रशिक्षण , शिक्षण पदधती, प्रगती मूल्यमापन व देणगीदार जोडणी या सर्व गोष्टींचा समावेश आहे. आयटीच संस्थेने निवडलेले स्कूल लिडर ( मुख्याध्यापक ) शिक्षक व शाळा चालविण्यासाठी लागणारा खर्च आचटीच संस्था देणगीदार संस्था मार्फत करेल अशा पदध्दतीची शाळा चालविण्यासाठी लागणा-या सर्व प्रकारच्या परवानगी ( शासन मान्यता, युडायस क्रमांक इ.) आयटीच संस्थेला कराव्या लागतील.<br><br>सदर इंग्रजी उच्च प्राथमिक व माध्यमिक विदयालयासाठी सर्व भौतिक सुविधा, आवश्यक वर्ग खोल्या तसेच वीज व पाणी पुरवठा देणे इत्यादी सुविधा महानगरपालिका करेल. आयटीच संस्थेमार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासुन इयता ८ वी ते १० वी ची इंग्रजी विदयालय सुरु करणेबाबत प्रथम शासनाची मान्यता घेऊन शाळा सुरु करणे मा. महापालिका सेभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६३१**
**दिनांक – १६ /७/२०२४**

**विषय क्रमांक ६३१**
**खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६३१<br>दिनांक–**<br>१६/७/२०२४ | मा.महापालिका मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/४/कावि/२३३/२०२४ दि.१५/०७/२०२४ अन्वये, स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मारकाच्या बांधकामास यशवंतराव चव्हाण स्मारक समिती अनुदान अदा करणे बाबत. |
| **ठराव क्र. ६३१<br>दिनांक**<br>१६/७/२०२४ | मा.महापालिका मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र.क्रीडा/५/कावि/ २३३/२०२४ दि.१५/०७/२०२४ अन्वये,यशवंतराव चव्हाण स्मारक समिती यांना स्मारकाचे अपूर्ण असलेले काम पूर्ण करणेकामी महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम ८८ व ६६ (२५) मधील तरतुदीनुसार यशवंतरराव |

चव्हाण स्मारक समितीस र.रू ५ कोटी रुपयांचे अनुदान अदा करणेस व सदरची रक्कम "र.रू ३० लाखा व्यतिरिक्त शासन मान्यतेने द्यावयाचे अनुदान" या लेखाशिर्षावर लेखाशाखेकडून र.रु. ५ कोटी तरतुद वर्ग करून घेणेस व महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर अदा करणेस मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

मा. अध्यक्ष यशवंतराव चव्हाण स्मारक समिती, संत तुकाराम उद्यान शेजारी, प्राधिकरण, निगडी, पुणे ४४ यांनी सदर पत्रान्वये स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी पिंपरी-चिंचवडसह महाराष्ट्रभर राबविलेल्या औद्योगिक धोरणांमुळे पिंपरी-चिंचवड सारख्या छोट्या गावामध्ये उद्योगधंदे सुरू होऊन अल्पावधीत पिंपरी-चिंचवड गावाचे रुपांतर मोठ्या औद्योगिक वसाहतीमध्ये झाले, त्यामुळेच ही नगरी राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर औद्योगिक नगरी म्हणून नावारुपास आली. त्यांनी राबविलेल्या औद्योगिक आणि सहकार धोरणांमुळेच लाखो हातांना रोजगार मिळाला, छोट्या-मोठ्या उद्योगांना चालना मिळाली, व्यापाऱ्यांना व्यापार मिळाला, त्यांचे हेच अनंत उपकार आपणांवरती आहेत. हेच ऋण फेडण्याचे औचित्य मिळावे तसेच त्यांच्या कार्याची प्रेरणा व स्फूर्ति भावी पिढीतील युवकांना मिळावी म्हणून त्यांचे स्मारक उभारणे हे आपणा सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. याच सामाजिक बांधिलकीतून प्रेरित होऊन आम्ही यशवंतप्रेमी एकत्र येऊन स्व. यशवंतराव चव्हाण यांचे पिंपरी-चिंचवड येथे भव्य स्मारक उभारण्याच्या सामाजिक बांधिलकीतून १९८९ मध्ये 'यशवंतराव चव्हाण स्मारक समितीची, पिंपरी-चिंचवड, येथे स्थापना करून सदरील संस्था 'मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये दि. ०६/०९/१९८९ रोजी नोंदणीकृत केली आहे. त्यानंतर १९९२ मध्ये प्राधिकरण, निगडी येथे स्मारक उभारण्यासाठी ४४ गुंठेचा भूखंड घेऊन त्यामध्ये स्व. यशवंतराव चव्हाण यांचे भव्य स्मारक, ग्रंथालय व वाचनालय, गोरगरीब व अनाथ मुलांसाठी अभ्यासिका (वसतिगृह), वधू-वर सूचक केंद्र, विद्यार्थी मार्गदर्शन केंद्र, वैद्यकीय उपचार केंद्र, भव्य सांस्कृतिक भवन, व्यायामशाळा इ. बांधण्याचे नियोजन आहे. स्व. यशवंतराव चव्हाण स्मारक' भवनाचा आराखडा मंजूर होऊन, तळ मजला ते सहाव्या मजल्यापर्यंतचे बांधकाम सुरू आहे. संपूर्ण बांधकामासाठी अंदाजे २५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सन २०१८ ते २०२१ या कालावधीमध्ये र.रू. ५ कोटी तसेच सन २०२३-२०२४ या कालावधीमध्ये र.रु. ५ कोटी असे एकुण र.रु. १० कोटी अनुदान देण्यात आलेले आहे. मात्र या रक्कमेतुन इमारतीचे बांधकाम आणि इतर कामे अपूर्ण राहिले असून सदरी बांधकामाची वास्तुविशारद यांनी दिलेल्या अंदाजे खर्चाच्या पत्रानुसार सदरच्या अपुर्ण बांधकामासाठीचा अंदाजे खर्च र.रु.७,१३,४६,९५७.८३ इतका असुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका मार्फत र.रु. ५ कोटी चे अनुदान रुपी मदत करावी व उर्वरित खर्च स्मारक समिती मार्फत करण्यात येणार आहे. यापुढे सदर इमारतीकरीता येणा-या खर्चाबाबत स्मारक समिती मार्फत कोणतीही शासकीय मदत मागितली जाणार नाही असे हमीपत्र यशवंतराव चव्हाण स्मारक समिती यांनी दिलेले आहे.

याबाबत स्मारक समिती इमारतीचे अपूर्ण असलेले बांधकाम आणि इतर कामे अपूर्ण राहिलेली असल्याने आमदार आश्विनी लक्ष्मण जगताप यांनी दि.१२/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदय यांना उर्वरित अपुर्ण कामांकरीता र.रु. ५ कोटी अनुदान मिळणेकामी विनंती अर्ज केला आहे. सदर पत्रावर मा.मुख्यमंत्री यांनी "आयुक्त,पिंपरी चिचवड महानगरपालिका - तातडीने अ प्रमाणे तपासून उचित कार्यवाही करावी" असे नमुद केलेले आहे. त्यानुसार तसेच सदर पत्राच्या अनुषंगाने मा. आयुक्तसो यांनी सदरचा विषय मा. महापालिका सभा यांसकडे सादर करणेकामी सुचना देण्यात आलेल्या आहेत.

मा. महापालिका सभा सदस्य ठराव क्र. २१४ दि. २२/०६/२०१८ व महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र क्र.पीसीसी-३०१९ /प्र.क्र.१५ /नवि-२२ दि. १६/०२/२०१९ अन्वये,

स्व.यशवंतरावजी चव्हाण यांचे स्मारक उभे रहावे याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत यशवंतराव चव्हाण स्मारक समिती, संत तुकाराम उद्यान शेजारी, प्राधिकरण, निगडी, पुणे ४४ या समितीस ५ कोटी देणगी स्वरुपात अदा करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार मानवहिताच्या दृष्टीकोनातून काम करणा-या संस्थांना अनुदाने या क्रीडा विभागातील “र.रू ३० लाखा व्यतिरिक्त शासन मान्यतेने द्यावयाचे अनुदान “ या लेखाशिर्षामधून यशवंतराव चव्हाण स्मारक समिती यांना र.रू ५ कोटी अनुदानासाठी अदा केलेले आहेत.

तसेच मा. स्थायी समिती प्रशासक ठराव क्र.२०७० दि.०९/०८/२०२३ तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका सभा ठराव क्र.३७०, दि.२७/०६/२०२३ व महाराष्ट्र शासन याचेकडील पत्र क्र. पीसीसी ३०१९/ प्र.क्र.१५/नवि-२२, दि.२७/०७/२०२३ अन्वये, स्व.यशवंतरावजी चव्हाण यांचे स्मारक उभे रहावे याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत यशवंतराव चव्हाण स्मारक समिती, संत तुकाराम उद्यान शेजारी, प्राधिकरण, निगडी, पुणे ४४ या समितीस ५ कोटी देणगी स्वरुपात अदा करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार मानवहिताच्या दृष्टीकोनातून काम करणा-या संस्थांना अनुदाने या क्रीडा विभागातील “र.रू ३० लाखा व्यतिरिक्त शासन मान्यतेने द्यावयाचे अनुदान” या लेखाशिर्षामधून यशवंतराव चव्हाण स्मारक समिती यांना र.रू ५ कोटी अनुदानासाठी अदा केलेले आहेत.

तरी यशवंतराव चव्हाण स्मारक समिती यांना स्मारकाचे अपूर्ण असलेले काम पूर्ण करणेकामी महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम ८८ व ६६ (२५) मधील तरतुदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने यशवंतरराव चव्हाण स्मारक समितीस र.रू ५ कोटी रुपयांचे अनुदान अदा करणे बाबत खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१) इकडील विभागाकडील “र.रू ३० लाखा व्यतिरिक्त शासन मान्यतेने द्यावयाचे अनुदान” या लेखाशिर्षावर र.रू ३० लाख इतकी तरतुद उपलब्ध आहे यशवंतराव चव्हाण स्मारक समिती यांना अनुदान द्यावयाचे झाल्यास सदर लेखाशिर्षावर आवश्यक तरतुद उपलब्ध करून घेऊन आवश्यक आहे

२) यशवंतराव चव्हाण स्मारक समिती यांस र.रू ५ कोटी अदा करणेस मा. महापालिका सभेची मान्यता घेऊन मा.महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

३) सनाची मान्यता मिळाल्यानंतर यशवंतराव चव्हाण स्मारक समिती यांचेशी विहित नमुन्यात करारनामा करून घ्यावा लागेल.

४) सदर अनुदान करणे कामी शासनाची मान्यता मिळेपर्यंत लेखा शाखेकडून “र.रू ३० लाखा व्यतिरिक्त शासन मान्यतेने द्यावयाचे अनुदान” या लेखाशिर्षावर तरतुद र.रू.५ कोटी उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

५) यशवंतराव चव्हाण स्मारक समिती यांना देणगी र.रु.५ कोटी अदा करणेस मा. महापालिका सभेची व मा. महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेऊन त्यांना एक रक्कमी रक्कम अदा न करता पहिल्या टप्यामध्ये र.रु.२.५० कोटी प्रमाणे, व दुस-या टप्यात र.रु.१.५० कोटी तसेच शेवटच्या टप्पयात र.रु.१ कोटी याप्रमाणे अदा करणे योग्य होईल. त्यामध्ये पहिल्या टप्प्यातील रक्कमेच्या ७५% रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्रा नुसार मा.कार्यकारी अभियंता (स्थापत्य) अ क्षेत्रीय कार्यालय, पिंपरी चिंचवड म.न.पा. यांनी, प्रत्यक्ष बांधकाम किती झाले याबाबत वेळोवेळी पाहणी, तपासणी करून त्यांच्याकडून तसा तांत्रिक अहवाल प्राप्त झाल्यानंतर, र.रु.१.५० कोटी व र.रु.१कोटी

| | |
|---|---|
| | अदा करणे शक्य आहे.<br>तरी यशवंतराव चव्हाण स्मारक समिती यांना स्मारकाचे अपूर्ण असलेले काम पूर्ण करणेकामी महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम ८८ व ६६ (२५) मधील तरतुदीनुसार यशवंतरराव चव्हाण स्मारक समितीस र.रू ५ कोटी रुपयांचे अनुदान अदा करणेस व सदरची रक्कम “र.रू ३० लाखा व्यतिरिक्त शासन मान्यतेने द्यावयाचे अनुदान” या लेखाशिर्षावर लेखाशाखेकडून र.रु. ५ कोटी तरतुद वर्ग करून घेणेस व त्यास महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर सदर अनुदान अदा करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६३२** **विषय क्रमांक ६३२**

**दिनांक – १६ /७/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६३२<br>दिनांक–**<br>१६/७/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पर्या/१८/कावि/३१/२०२४ दि.१६/०७/२०२४ अन्वये, आळंदी,श्री.संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी २०२४ करीता इंद्रायणी नदीपात्रातील जलपर्णी काढणे बाबत. |
| **ठराव क्र. ६३२<br>दिनांक**<br>१६/७/२०२४ | मा.महापालिका मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. पर्या/१८/कावि/३१/२०२४ दि.१६/०७/२०२४ अन्वये,दरवर्षी आषाढी वारीनिमित्त लाखोंच्या संख्येने भाविक आळंदी परिसरात येत असतात. तसेच श्रध्देने आळंदी येथे नदीमध्ये स्नान करतात. त्यास अनुसरून मुख्याधिकारी आळंदी नगरपरिषद आळंदी यांनी दि. ०३/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये ‘दरवर्षीप्रमाणे आळंदी नगरपरिषद हद्दीतील जलपर्णी काढून मिळणेकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मदत मिळणेबाबत’ विनंती केली आहे.<br>तसेच मा. जिल्हाधिकारी साहेबांनी आषाढी वारीनिमित्त आळंदी येथे पाहणी केली असता आळंदी व देहू येथील नदीतील जलपर्णी पिंपरी चिंचवड मनपामार्फत काढणेबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार आळंदी व देहू येथील नदीपात्रातील जलपर्णी काढणेत आलेली आहे. तसेच पाहणी केली असता आळंदी नगरपरिषदेची १.८० किमी लांबीची हद्द पिंपरी चिंचवड मनपा लगत असून नदीच्या पूर्वेस व पश्चिमेस पिंपरी चिंचवड मनपाची हद्द आहे. त्यामुळे आळंदी नगरपरिषदेतील १.८०किमि लांबीचा काठ स्वच्छ ठेवणे गरजेचे असून सदर भागातील जलपर्णी व इतर वाहणारा कचरा मनपा हद्दीत आल्यानंतर पिंपरी चिंचवड मनपा मार्फतच काढावा लागत आहे. त्यामुळे देहू येथील १.०० किमी व आळंदी येथील १.८० किमी लांबीच्या इंद्रायणी नदीच्या पात्रातील जलपर्णी काढण्यासाठी आवश्यकतेनुसार येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास र.रु. २,१९,८००/- प्रती महिना काम करणे आवश्यक आहे. तथापि सदरचे काम पिंपरी चिंचवड मनपा हद्दीबाहेरील असल्याने महापालिका सभेची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६३३** **विषय क्रमांक ६३३**

**दिनांक– १६ /७/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६३३ दिनांक– १६/७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. साप्रवि/७/कावि/३०५/२०२४, दि.१६/०७/२०२४ अन्वये, मुख्यलेखापरिक्षक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदाचे श्रेणीवाढ करणेबाबतच्या शासन निर्णयाचे अवलोकन करणेबाबत. |
| **ठराव क्र. ६३३ दिनांक १६/७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. साप्रवि/७/कावि/३०५/२०२४, दि.१६/०७/२०२४ अन्वये, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५(३) नुसार महापालिकेच्या आस्थापनेवर “मुख्यलेखापरीक्षक” या संवर्गातील अधिकाऱ्याची शासनामार्फत प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली जात असते. महानगरपालिकेची वाढती लोकसंख्या, मोठ्या प्रमाणात सुरु असलेली विकासकामे, नागरी सुविधांची आवश्यकता व भविष्यातील नियोजित भांडवली विकासात्मक कामाचे स्वरुप या सर्व बाबींचा विचार करुन “मुख्यलेखापरीक्षक” या पदाची श्रेणीवाढ करणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेमार्फत शासनाकडे सादर करणेत आलेला होता.<br>सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्र. पीसीसी-२०२१/प्र.क्र.३२०/नवि-२२, दि. ०२ नोव्हेंबर २०२१ अन्वये मुख्यलेखापरीक्षक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, या पदाची श्रेणीवाढ सह संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (गट अ) या पदावरुन संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (गट अ) या पदामध्ये (वेतनश्रेणी ३७४००-६७०००, ग्रेड वेतन ८९००) (६व्या वेतन आयोगाप्रमाणे) ७व्या वेतन आयोगानुसार पे मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-२९ प्रमाणे (वेतनश्रेणी १३११००-२१६६००) करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१मधील तरतुदीस अनुसरुन शासनाने मान्यता दिलेली आहे. प्रस्तुत शासन मान्यते बाबतच्या शासन निर्णयाचे मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांनी अवलोकन केले. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६३४** **विषय क्रमांक ६३४**

**दिनांक – १६ /७/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६३४ दिनांक – १६/७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र./हक्षेका/स्था/५९१/२०२४, दि. १६/०७/२०२४ अन्वये, दापोडी हुतात्मा भगतसिंग शाळा इमारतीचे विस्तारिकरण करणे" या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ६३४ दिनांक १६/७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र./हक्षेका/स्था/५९१/२०२४, दि. १६/०७/२०२४ अन्वये, " दापोडी भगतसिंग शाळा पाडून नविन इमारत बांधणे" या कामाच्या निविदेअंतर्गत शाळेच्या इमारतीचे मुले व मुली अशा दोन भागात पूर्वीची इमारत होती. तशीच इमारत मुले व मुली अशा दोन भागात 'सी' टाईप इमारत सद्यस्थितीत बांधणेचे प्रस्तावित होते. त्यापैकी मुलांचे इमारतीचे P+4 एवढे बांधकाम करणेत आलेले आहे व मुलींकडील इमारतीचे पार्किंगचे बांधकाम झालेले आहे. सदर कामाची निविदा रक्कमे इतके काम पूर्ण झाल्यामुळे बांधकाम परवानगी मंजूर नकाशानुसार मुलांकडील इमारतीचे दोन मजले (पाचवा व सहावा) बांधणेचे काम बाकी असून मुलींकडील सहा मजले बांधणे बाकी आहे. उर्वरित शाळेचे मुलांचे बाजूकडील इमारत पाचवा, सहावा मजला व मुलीची बाजूकडील इमारतीमधील पहिला ते सहावा मजला असे एकुण ४८ पैकी १४ खोल्याचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित ३४ खोल्या इमारत बांधण्यासाठी सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकात "दापोडी हुतात्मा भगतसिंग शाळा इमारतीचे विस्तारिकरण करणे" या कामासाठी प्रशासकीय मान्यता र.रू.१०,००,००,०००/- (पान क्र.४०, अ.क्र.३५) आहे. सदरची कामाची ढोबळ अंदाजपत्रकीय र.रू.४०,००,००,०००/- (अक्षरी र.रू. चाळीस कोटी) इतकी सन २०२२-२३ च्या दरसुचीनुसार येत असून त्यास सुधारित प्रशासकीय मान्यता र.रू.४०,००,००,०००/- (अक्षरी र.रू. चाळीस कोटी) यास मा. महापालिका सभेची मंजूरी आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

| अ.क्र. | पान क्र. /अ.क्र. | कामाचे नाव | मुळ प्रशासकीय मान्यता र.रू. | सुधारित प्रशासकीय मान्यता र.रू. | सन २०२४-२५ ची मुळ तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४०/३५ | दापोडी हुतात्मा भगतसिंग शाळा इमारतीचे विस्तारिकरण करणे. | १०,००,००,०००/- | ४०,००,००,०००/- | ५०,००,०००/- |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६३५** **विषय क्रमांक ६३५**

**दिनांक – १६ /७/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

**विषय क्र. ६३५ दिनांक – १६/७/२०२४**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र .हक्षेका/स्था/५९०/२०२४, दि.१६/०७/२०२४ अन्वये, प्रभाग क्र. २० संत तुकारामनगर चव्हाण स्मृती रूग्णालय येथील चौथ्या मजल्यावरील वॉर्डचे एम.सी.ए. मानांकनानुसार अद्यावत पध्दतीने नुतनीकरण करणे” या कामाचा समावेश सन २०२४-२५ च्या मूळ अंदाजपत्रकात करणेकामी मान्यता देणे बाबत.

**ठराव क्र. ६३५ दिनांक १६/७/२०२४**

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.हक्षेका/स्था/५९०/२०२४, दि.१६/०७/२०२४ अन्वये, कै.यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात पिंपरी येथे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सन २०१८ साली चालू करण्यात आला आहे. चौथ्या मजल्यावरील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या एम.सी.आय. मानांकानुसार करणे आवश्यक आहे. चौथ्या मजल्याचे नुतनीकरण करणेकामी मा.आयुक्त यांनी दि.०४/०४/२०२४ रोजी बैठकी दरम्यान सुचना केलेल्या आहेत. तसेच दि.१३/०६/२०२४ चे पत्रान्वये मा. अधिष्ठाता, पदव्युतर पदवी संस्था, वाय.सी.एम. रूग्णालय यांनी चौथ्या मजल्याचे नुतनीकरण करणेकामी आवश्यक तरतूद व प्रशासकीय मान्यता घेणेकामी कार्यवाही करावी अशी मागणी केलेली आहे.

सदर कामास पुरेशी तरतूद नसल्याने सन २०२४-२५ च्या मूळ अंदाजपत्रकातून सदरचे काम वगळण्यात आले आहे. तथापि, सदर काम तातडीचे व अत्यावश्यक स्वरूपाचे असल्याने सदर कामाचा समावेश सन २०२४-२५ च्या मूळ अंदाजपत्रकात नव्याने विशेष योजना या लेखाशिर्षामध्ये करणे आवश्यक आहे. तसेच सदर कामास आवश्यक तरतूद उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी र.रू.१५,००,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे असे कळविले आहे. तसेच सदर कामास सन २०२४-२५ करिता र.रू. ५०,००,०००/- इतकी तरतूद आवश्यक आहे. सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकात प्रभाग क्र. २० संत तुकारामनगर चव्हाण स्मृती रूग्णालय येथील चौथ्या मजल्यावरील वॉर्डचे एम. सी. ए. मानांकनानुसार अद्यावत पध्दतीने नुतनीकरण करणे. या कामासाठी प्रशासकीय मान्यता र.रू.१५,००,००,०००/- इतकी आहे. त्यास महापालिका सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | नव्याने समाविष्ट करावयाचे कामाचे नाव / तरतूद वर्ग करावयाचे कामाचे नाव | आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रू. | लेखाशिर्ष | सन २०२४-२५ ची उपलब्ध तरतूद | आवश्यक तरतूद र.रू. | | शिल्लक तरतूद र.रू. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | | ७ |
| १ | प्रभाग क्र. २० संत तुकारामनगर चव्हाण स्मृती रूग्णालय येथील चौथ्या मजल्यावरील वॉर्डचे एम. सी. ए. मानांकनानुसार अद्यावत पध्दतीने नुतनीकरण करणे. | १५,००,००,००० | विशेष योजना (नविन काम) | ० | ५०,००,००० | ० | ५०,००,००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | प्रभाग क्र. २० संत तुकारामनगर मधील वाय सी एम हॉस्पिटल येथे सहाव्या मजल्यावर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी कक्ष तयार करणे व आवश्यक कामे करणे. (बजेट कोड 22300082) (पान.२३, अ.क्र.१३) | १०,००,००,००० | विशेष योजना | एकूण उपलब्ध तरतूद र.रू. ३,०२,०८,००० खर्च वजा जाता शिल्लक र.रू. १,०५,४०,४१९ | ० | ५०,००,००० | ५५,४०,४१९ |

तरी वरील नमूदप्रमाणे प्र.क्र. २० संत तुकाराम नगर यंशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथिल चौथ्या मजल्यावरील एम.सी.ए मानांकनानुसार अद्ययावत पध्दतीने नुतणीकरण करणे या कामास र.रु. १५,००,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता व र.रु. ५०,००,०००/- इतकी तरतुद मिळणेकामी वाढ-घट करण्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६३६** **विषय क्रमांक ६३६**

**दिनांक – १६ /७/२०२४** **खाते – मा. आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६३६ दिनांक - १६/७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. साप्रवि/७/कावि/३०६/२०२४, दि.१६/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रशासकीय संवर्गातील पदांचे वेतनश्रेणी व संवर्गामध्ये बदल करणेस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ६३६ दिनांक - १६/०७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. साप्रवि/७/कावि/३०६/२०२४, दि.१६/०७/२०२४ अन्वये,महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-२०१९/प्र.क्र.२३४ (भाग-१)/कार्या-१२ दिनांक २३ मे २०२२ अन्वये लिपिक वर्गीय गट-क मधील पदोन्नतीचे स्तर कमी करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने लिपिक वर्गीय गट-क (प्रशासकीय संवर्ग) पदोन्नती साखळीमध्ये खालील प्रमाणे बदल प्रस्तावित करण्यात येत आहे.<br>१. महापालिका आस्थापनेवरील लिपिक वर्गीय गट-क (प्रशासकीय संवर्ग) पदोन्नतीची साखळी -<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर लिपिक वर्गीय गट-क (प्रशासकीय |

संवर्ग) पदाची उर्ध्वगामी पदोन्नती साखळी खालील प्रमाणे आहे.

अतिरिक्त आयुक्त (गट-अ)
↑
सह आयुक्त (गट-अ)
↑
उपआयुक्त(गट-अ)
↑
सहाय्यक आयुक्त (गट-अ)
↑
प्रशासन अधिकारी (गट-ब)
↑
कार्यालय अधिक्षक (गट-क)
↑
मुख्य लिपिक (गट-क)
↑
लिपिक (गट-क)

२. कार्यालय अधिक्षक/नायब तहसिलदार पदाची श्रेणीवाढ -

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. पी.सी.सी./३०९१/४७५/प्र.क्र.९१/१९९१, दिनांक २२ ऑगस्ट १९९१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मंडलाधिकारी, विभागीय अधिकारी या पदांना वर्ग - ब चा दर्जा देवून, त्या पदाची वेतनश्रेणी सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. कार्यालय अधिक्षक या ऐवजी प्रशासन अधिकारी, करसंकलन व नायब तहसिलदार (क श्रेणी) या पदाचे पदनाम मंडलाधिकारी असे करून सदर पदांना वर्ग - ब चा दर्जा देण्यास व त्या पदांची वेतनश्रेणी वाढ करण्यास शासन मंजूरी देण्यात आलेली आहे. परंतु कार्यालय अधिक्षक अभिनामाचा गट –ब मध्ये अंतर्भाव करण्यात आलेला नसल्याचे सकृत दर्शनी निदर्शनास येते.

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम १९९८ अन्वये पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने महापालिका कर्मचा-यांना १ जानेवारी १९९६ पासून, सुधारीत वेतनश्रेणी लेखा विभागाकडील दिनांक १० मे १९९९ चे आदेशान्वये परिशिष्ठ अ नुसार लागू करण्यात आली. परिशिष्ट अ पान क्र. ९ अनुक्रमांक ४०वर नमूद नुसार प्रशासन अधिकारी / सहाय्यक कर आकारणी व करवसूली अधिकारी / सहाय्यक करवसूली अधिकारी / तपासणी अधिकारी / भूमी व जिंदगी अधिकारी / मंडलाधिकारी / व्यवस्थापक प्रेक्षागृह / निवडणूक अधिकारी / भांडार अधिकारी / विभागीय अधिकारी या पदांची वेतनश्रेणी र.रू. २०००-३५०० वरून र.रू.६५००-१०५०० अशी सुधारीत करण्यात आली आहे. त्यामध्ये कार्यालय अधिक्षक पद दर्शविण्यात आलेले नाही.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाव्या वेतन आयोगानुसार कार्यालय अधिक्षक हे पद गट क मध्येच दर्शविण्यात येवून वेतनश्रेणी र.रू.९३००-३४८०० ग्रेड वेतन ४६०० व सातव्या वेतन आयोगानुसार पे लेव्हल एस-१५ (४१८००-१३२३००) ग्रेड पे - ४४०० असे आहे.

३. कार्यालय अधिक्षक व प्रशासन अधिकारी यांची कर्तेव्ये व जबाबदा-या -

कार्यालय अधिक्षक व प्रशासन अधिकारी या पदांकरीता प्रामुख्याने प्रशासकीय कामकाजाशी संबंधित नियोजन, संघटन, निदेशन वा संचालन, अभिप्रेरणा, समन्वय व नियंत्रण राखणे इ. समान जबाबदा-या व कर्तव्ये आहेत. असे असताना कार्यालय अधिक्षक या अभिनामाचे पद गट –क संवर्गामध्ये तर प्रशासन अधिकारी या अभिनामाचे पदाचा गट-ब संवर्गामध्ये अंतर्भाव करण्यात आलेला आहे. तसेच प्रशासकीय सेवेतील प्रशासन अधिकारी व कार्यालय अधिक्षक या संवर्गांचे कामकाजाचे स्वरूप देखील एकसमान आहे. महानगरपालिका आस्थापनेवरील “कार्यालय अधिक्षक” या अभिनामाच्या पदाचे कर्मचारी हे महानगरपालिकेमध्ये जबाबदारीचे व महत्वाचे पदावर शाखाप्रमुखांचे अधिनस्त पर्यवेक्षकीय कामकाज करीत असतात.

४.पदोन्नती साखळीच्या पुनरावलोकनाची आवश्यकता -

१. प्रशासकीय संवर्ग संरचनांसाठी आदर्श पदोन्नती साखळी विकसित करण्यासाठी व्यवहार्यता धोरण आणि नियोजन तपासले गेले पाहीजे. लिपिक वर्गीय (प्रशासकीय संवर्ग) संरचनेमध्ये कार्यात्मक गरजा आणि सेवेची आवश्यकता विचारात घेणे आवश्यक आहे. उक्त पदोन्नती साखळीमुळे सेवेच्या मूळ उद्दिष्टांचा विपर्यास होतो, या पदोन्नतीच्या साखळीतील कार्यात्मक सेवेची मोठ्या संख्येने पदे आढळतात, परंतु सेवेची प्रभावी पुनरावृत्ती होत नाही. उपरोक्त विस्तृत स्वरुपाच्या पदोन्नती साखळीमुळे कधीकधी तदर्थ उपायांचा अवलंब करण्यास भाग पाडले जाते कारण महापालिकेच्या कार्यात्मक आवश्यकता अचूकपणे अपेक्षित नसतात किंवा पदोन्नतीमध्ये अचानक अडथळे येतात. कार्यात्मक आवश्यकता आणि पदोन्नती साखळीमध्ये योग्य संतुलन राखणे हा मुख्य उद्देश असल्याने उपरोक्त पदोन्नती साखळीचे पुनरावलोकन करणे गरजेचे आहे. यास्तव लिपिक वर्गीय (प्रशासकीय संवर्ग) पदे शक्य तितक्या योग्य सेवेत विलीन करणे इष्ट आहे.

२. संवर्ग व्यवस्थापनामध्ये सेवेतील प्रत्येक कर्मचारी तो स्थिरपणे पदोन्नतीव्दारे पदोन्नती साखळीचा लाभ घेईल असा उद्देश आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेमध्ये लिपिक पदावर कामकाज करणा-या कर्मचा-यांना जवळपास १५ वर्षांनंतर मुख्य लिपिक या पदावर पदोन्नत्ती/बढती दिली जाते. आणि संवर्गाच्या पदोन्नती साखळी रचनेद्वारे लादलेली मर्यादा ज्याने फक्त काही कर्मचा-यांनाच पदोन्नतीच्या साखळीवरच्या उच्च पदापर्यंत पोहोचता येते. त्यामुळे पदोन्नत्ती मिळणेपुर्वीच बरेचसे कर्मचारी सेवानिवृत्त होतात अथवा आणखी १० वर्षे किंवा अधिक वर्षे पदोन्नत्ती करीता वाट पहावी लागते. महानगरपालिकेमध्ये लिपिक, मुख्य लिपिक व कार्यालय अधिक्षक अशी सर्व पदे ही गट - क मधील प्रशासकीय संवर्गामध्ये येतात.

३. पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या सन २०११ चे जनगणनेनुसार जवळपास १७ लाख एवढी आहे, त्याप्रमाणे मागील काही वर्षांमध्ये शहराच्या लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली असून वाढते नागरीकारण व त्याअनुषंगाने महानगरपालिकेवर सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत पडणारा बोजा व ताण दिवसेंदिवस सतत वाढत आहे. शहरातील नागरीकांना आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविणे हे महानगरपालिकेस बंधनकारक आहे, असे असून देखिल महानगरपालिकेमधील प्रत्येक कर्मचारी हा सचोटीने व प्रामाणिकपणे कामकाज करीत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा गट – ब वर्गामध्ये समावेश करणेत आलेला आहे. त्याचप्रमाणे भविष्यकाळात नविन गावांचा महापालिका हद्दीमध्ये

समावेश होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. महापालिकेच्या पाच वर्षांच्या भूमिकेचा अंदाज घेण्याचा आणि सेवा/केडरच्या बदलत्या गरजांशी त्याचा संबंध जोडण्याचा गंभीर प्रयत्न झाला पाहिजे. सेवेच्या संवर्ग संरचनेच्या विविध स्तरांमध्ये जेथे कार्यात्मक आवश्यकता पूर्ण करेल आणि पुरेशा पदोन्नती संधी सुनिश्चित होतील तेथे प्रमाणित गुणोत्तर विहित करणे आवश्यक आहे.

५. संवर्ग व्यवस्थापना मध्ये सेवेतील प्रत्येक सदस्य (ती) तो स्थिरपणे शिडीवर चढेल अशी अपेक्षा आणि कॅडरच्या पिरॅमिडल रचनेद्वारे लादलेल्या मर्यादांबद्दल समेट करणे आहे. ज्यामुळे केवळ काहींनाच शीर्षस्थानी पोहोचता येते. पिरॅमिडल संस्थेची रचना खालच्या स्तरावरील ऑपरेशनल कामासाठी मोठ्या संख्येने आवश्यक असते ज्यांचे पर्यवेक्षण काही मोजक्या लोकांकडून केले जाते आणि ज्यांचे नियंत्रण आणि त्याहूनही कमी लोकांमार्फत मार्गदर्शन केले जाते. तितकेच महत्त्वाचे म्हणजे, वैयक्तिक सेवकाच्या दृष्टिकोनातून 'पदोन्नती' महत्त्वाचे आहे. कारण ते आर्थिक सुधारणा, उच्च जबाबदा-यांमुळे सेवेतील समाधान आणि, सुधारित सामाजिक स्थिती करीता आवश्यक आहे. आर्थिक सुधारणा आणि सामाजिक स्थिती सुधारणे महत्त्वाचे असले तरी, सेवेच्या सदस्यांच्या प्रेरणेसाठी उच्च जबाबदा-या आणि नोकरीतील समाधान हे कदाचित कमी महत्त्वाचे नाही. सुधारित सामाजिक स्थिती सामान्यतः पदनामाशी संबंधित असते. कार्यात्मक आवश्यकतांचे मूल्यमापन केल्यानंतर, विविध पदांशी संलग्न कर्तव्ये आणि जबाबदा-या मानव संसाधनाचा वापर इष्टतम करण्यासाठी आणि त्याचप्रमाणे सुरळीत प्रगती सुनिश्चित करण्यासाठी पुनर्संचयित केल्या जाऊ शकतात.

६. महापालिकेच्या प्रशासकीय संवर्ग पुनरावलोकनांच्या पद्धतीमध्ये गृहमूल्यांकन, मूलभूत बदल, दीर्घकालीन समस्या आणि नियोजन इ. गुणात्मक बदल घडवून आणण्याची गरज आहे. त्यामुळे प्रशासकीय संवर्गातील पदोन्नतीमध्ये ३०% संरचनात्मक गुणोत्तर प्रमाण निश्चित करणे आवश्यक आहे.

कार्यालयीन व्यवस्थापनामध्ये एका वेळी ५ वर्षांच्या कालावधीसाठी वैज्ञानिक आधारावर भविष्यातील मनुष्यबळाच्या गरजांचा अंदाज घेणे, भविष्यातील पदोन्नतीमधील अडथळे टाळता येतील अशा प्रकारे पदोन्नती साखळीची योजनेची आवश्यकता, सेवेची परिणामकारकता वाढविणे तसेच कर्मचा-यांच्या पदोन्नतीतील अपेक्षांसह कार्यात्मक गरजा सुसंगत करण्यासाठी पदोन्नती साखळीची पुनर्रचना करणे आवश्यक आहे.

शासन मंजूर सेवाप्रवेश नियम तसेच मंजूर पदांचा तपशिल.

| **पदनाम** | **वेतनश्रेणी** | **पद संख्या** | **नेमणूकीची अर्हता** |
|---|---|---|---|
| कार्यालय अधिक्षक गट – क | वेतनश्रेणी एस–१५ (र.रु.४१८०० - १३२३००)<br>ग्रेड वेतन ४४०० | ४४ | **पदोन्नती १००%-**<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मुख्य लिपिक संवर्गात ३ वर्ष सेवा पुर्ण झालेल्या व विभागीय परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचा-यांची |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती |
| प्रशासन अधिकारी गट – ब | वेतनश्रेणी एस-१६ (र.रु ४१८०० – १३२३००) ग्रेड वेतन ४६०० | २६ | **नामनिर्देशन/सरळसेवा ५०/% (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास)-** १. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक. २. शासकीय निमशासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील प्रशासकीय कामाचा ७ वर्षाचा अनुभव ३. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक **पदोन्नती ५०%** १. मान्यताप्राप्त विद्यापीठा कडील कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक. २.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यालय अधिक्षक या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिका-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |

लिपिक वर्गीय (प्रशासकीय संवर्ग) पदोन्नती साखळीतील शासन निर्देशानुसार पदोन्नत्तीचे स्तर कमी करणे आवश्यक असलेने प्रशासन अधिकारी पदाचे समावेशन कार्यालय अधिक्षक या पदामध्ये करणेत येवून खालील प्रमाणे सेवाप्रवेश नियम मंजूरीकामी प्रस्तावित करण्यात येत आहे

| पदनाम | वेतनश्रेणी | पदसंख्या | नेमणूकीची अर्हता |
|---|---|---|---|
| प्रशासन अधिकारी गट – ब **(कार्यालय अधिक्षक व प्रशासन अधिकारी पदाचे एकत्रिकरण करुन)** | पे.लेवल S– १७ वेतनश्रेणी र.रु ४७६००-१५११०० ग्रेड वेतन - ४८०० | ९२ (कार्या. अधि. एकुण मंजूर तसेच प्रशा. अधि एकुण मंजूर पदांसह ३०% | **प्रतिनियुक्ती १०/% -** १. राज्य शासन/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेतील समकक्ष पद ३ वर्ष धारण करणा-या योग्य अधिका-याची शासनाकडून प्रतिनियुक्तीने नियुक्ती **पदोन्नती ९०%** १. मान्यताप्राप्त विद्यापीठा कडील कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक. २.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | संरचनात्मक गुणोत्तर प्रमाण) | आस्थापनेवरील मुख्य लिपिक या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती.<br>**सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ:**<br>कार्यालय अधिक्षक व प्रशासन अधिकारी पदाचे एकत्रिकरण केलेमुळे उपरोक्त प्रमाणे पदोन्नतीची अर्हता धारण न करणा-या मुख्य लिपिक संवर्गातील कर्मचा-यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ पे लेव्हल एस-१६ वेतनश्रेणी ४४९००-१४२४०० ग्रेड पे-४५०० अनुज्ञेय राहील. |

उपरोक्त सेवाप्रवेश नियम बदलाच्या पुष्ट्यर्थ खालील प्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

१. कार्यालयीन अधिक्षक अभिनामाचे पदोन्नती पुर्व मुख्य लिपिक अभिनामाची ३०७ पदे महापालिकेच्या सुधारित आकृतीबंधामध्ये शासन मंजूरीकामी सादर करण्यात आलेली आहेत. त्यामुळे उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केलेनुसार प्रशासन अधिकारी (गट-ब) (कार्यालय अधिक्षक व प्रशासन अधिकारी पदाचे एकत्रिकरण करुन) पदोन्नतीकरीता मुख्य लिपिक एकुण मंजूर पदांच्या ३०% संरचनात्मक गुणोत्तर प्रमाण निश्चित केले असून ९२ पदे सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

२. महापालिका आस्थापनेवर कार्यालय अधिक्षक अभिनामाची ४४ पदे शासन मंजूर आहेत तसेच प्रशासन अधिकारी अभिनामाची एकुण २६ पदे शासन मंजूर आहेत. तथापि, कार्यालय अधिक्षक व प्रशासन अधिकारी पदाचे एकत्रिकरण केल्यास प्रशासन अधिकारी (गट-ब) नव्याने २२ पदे निर्माण करणे आवश्यक आहे.

३. पिंपरी चिंचवड महानगरपालिका (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार प्रशासन अधिकारी नेमणूकी करीता शासन प्रतिनियुक्तीची तरतुद नाही यास्तव प्रतिनियुक्तीकरिता १०% संरचनात्मक गुणोत्तर प्रमाण निश्चित करणे आवश्यक आहे.

४. कार्यालय अधिक्षक व प्रशासन अधिकारी पदाचे एकत्रिकरण केल्याने अतिरिक्त २२ पदे निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे महापालिकेवर पडणारा आर्थिक भार ३५% खर्चाच्या मर्यादित राहणार आहे.

| | |
|---|---|
| | ५. पिंपरी चिंचवड महानगरपालिका (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मंजूर होण्यापुर्वी महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेले मुख्य लिपिक संवर्गातील कर्मचारी हे प्रशासन अधिकारी (गट-ब) (कार्यालय अधिक्षक व प्रशासन अधिकारी पदाचे एकत्रिकरण करुन) पदोन्नतीची अर्हता धारण करीत नाहीत त्यामुळे असे कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहणार असल्याने त्यांचा महापालिकेतील प्रदिर्घ सेवाकालावधी विचारात घेवून केवळ सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेकरीता किमान पे लेव्हल एस-१६ वेतनश्रेणी ४४९००-१४२४०० ग्रेड पे- ४५०० या वेतनश्रेणीत लाभ अनुज्ञेय राहील त्यास मान्यता देणे आवश्यक आहे<br><br>६. कार्यालय अधिक्षक व प्रशासन अधिकारी ही दोन्ही पदे पर्यवेक्षीय असून त्यांच्या जबाबदा-या व कर्तव्ये समान आहेत.<br><br>७. कार्यालय अधिक्षक व प्रशासन अधिकारी पदाचे एकत्रिकरण करण्याची कार्यात्मक आवश्यकता आहे. तसेच समावेश केल्याने नेमणूकीचे प्रमाणे व पदोन्नती पुर्व संवर्ग वगळता मुख्य निकष यथास्थिती असणे आवश्यक असल्याने वस्तुनिष्ठपणे मूल्यांकन करणे आवश्यक आहे.<br><br>प्रस्तुत विषयास मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय -** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६३७** **विषय क्रमांक ६३७**

**दिनांक– १६ /७/२०२४** **खाते – मा. आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६३७ दिनांक - १६/७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मभा/१०/कावि/३१२/२०२४, दि.१६/०७/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागातील भंगार साहित्याची विक्री ई लिलावाव्दारे करणेस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ६३७ दिनांक - १६/०७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मभा/१०/कावि/३१२/२०२४, दि.१६/०७/२०२४ अन्वये “पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांनी ज्या त्या ठिकाणी जतन करून ठेवलेले जुने निरुपयोगी “जेथे आहे, जसे आहे तसे” या पध्दतीने लिलावाव्दारे विक्री करावयाचे आहे. अशा भंगार साहित्याचे मुल्यांकन शासकीय मुल्यांकार मे.ए.व्ही.शेवडे ॲन्ड असोसिएटस पुणे यांनी र.रू.१३,३४,३६७/- इतके मुल्यांकन केले आहे. प्रस्तुत किंमत अंदाजे असल्याने प्रत्यक्ष खुल्या ई लिलावात कमी/जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्र शासन निर्णय |

| | |
|---|---|
| | क्र.मातंसं०८०/६/२०१३-DIR-DIT(MH)३९ दि.३/१२/२०१४ अन्वये मुल्यांकन र.रू.१,००,०००/- च्या वर असलेस ई लिलावाव्दारे लिलाव करणेचे आदेश देण्यात आलेले आहेत. सदर उक्त भंगार साहित्याची विक्री लिलाव समितीच्या निर्णयानुसार ई लिलावाव्दारे करणेस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय -** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६३८** **विषय क्रमांक ६३८**

**दिनांक– १६ /७/२०२४** **खाते – मा. आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६३८ दिनांक - १६/७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.विमुका/०६/कावि/७४/२०२४, दि.१६/०७/२०२४ अन्वये, अ क्षेत्रीय कार्यालय प्रभाग क्र.१० व १९ अंतर्गत गणपती उत्सव सन २०२४, विविध क्रीडा स्पर्धा, जयंती, पुण्यतिथी, भूमिपूजन व इतर होणाऱ्या विविध कार्यक्रमाकरिता तात्पुरत्या स्वरुपात ध्वनिक्षेपण, प्रकाश व्यवस्था जनित्रसंच, सी.सी.टी व्ही. व अन्य विद्युत विषयक कामे करणे. (सन २४ -२५ ) ह्या कामाचे नांव सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकात समाविष्ट करून प्रशासकिय मान्यता देणे बाबत. |
| **ठराव क्र. ६३८ दिनांक - १६/०७/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र/विमुका/०६/कावि/७४/२०२४, दि.१६/०७/२०२४ अन्वये, अ क्षेत्रीय कार्यालय प्रभाग क्र.१० व १९ अंतर्गत गणपती उत्सव सन २०२४, विविध क्रीडा स्पर्धा, जयंती, पुण्यतिथी, भूमिपूजन व इतर होणाऱ्या विविध कार्यक्रमाकरिता तात्पुरत्या स्वरुपात ध्वनिक्षेपण, प्रकाश व्यवस्था जनित्रसंच, सी.सी.टी व्ही. व अन्य विद्युत विषयक कामे करणे. (सन २४ -२५ ) ह्या कामाचे र.रू. ४९,९९,६९२/- इतक्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार केले असुन सदर कामाकरीता अंदाजपत्रक २ मध्ये पानांक १८ वर र.रू. २,५०,०००००/- इतकी तरतूद उपलब्ध आहे. सदर कामाचे नांव सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकात समाविष्ट करून र.रू. ६०,०००००/- इतक्या अंदाजपत्रकिय रक्कमेस मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.. |
| **निर्णय -** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६३९** **विषय क्रमांक ६३९**

**दिनांक– १६ /७/२०२४** **खाते – मा. आयुक्त**

<table>
<tr><td>विषय क्र. ६३९ दिनांक - १६/७/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र स्था/PMAY/प्र/३१८/२०२४ दिनांक १६/०७/२०२४ अन्वये, केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका क्षेत्रात डुडूळगांव येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी निवासी गाळे बांधणेकामी प्रकल्पाच्या सदनिकांकरिता लाभार्थी हिस्सा निश्चित करणेबाबत.</td></tr>
<tr><td>ठराव क्र. ६३९ दिनांक - १६/०७/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र स्था/PMAY/प्र/३१८/२०२४ दिनांक १६/०७/२०२४ अन्वये, केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका क्षेत्रात डुडूळगांव येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ११९० निवासी गाळे (०५ इमारती P+15) बांधणे प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पाकरिता लघुत्तम दर प्राप्त ठेकेदार मे. शांती कन्स्ट्रक्शन (गुज) प्रा.लि. यांना कामाचे आदेश देणेत आलेले आहे. सदर प्रकल्पाकरिता मे. शांती कन्स्ट्रक्शन (गुज) प्रा.लि. यांचे लघुत्तम दर र.रु.१६७,८२,७५,८३६/- स्वीकृत करणेत आलेली आहे.<br>सद्यस्थितीत प्रकल्पाच्या इमारतीची कामे प्रगतिपथावर आहेत. सदरचा प्रकल्प पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत बांधण्यात येत असल्याने लाभार्थ्यांचा स्वहिस्सा निश्चित करावा लागणार आहे. त्याअनुषंगाने सदर प्रकल्पाचे सदनिकांसाठी अर्ज मागवून संगणकीय सोडतीनुसार लाभार्थी निश्चित करणे आवश्यक आहे. सदर प्रकल्पासाठी केंद्रशासनाकडून प्रति लाभार्थी र.रु.१.५ लक्ष व राज्य शासनाकडून प्रति लाभार्थी र.रु.१.०० लक्ष अनुदान प्राप्त होणार आहे. लाभार्थी हिश्श्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.
<table>
<tr><td>अ.क्र .</td><td>प्रकल्पाचे नाव</td><td>एकुण सदनिका</td><td>लाभार्थी हिस्सा प्रति सदनिका (निविदा स्विकृती रकमेनुसार)</td></tr>
<tr><td>१</td><td>डुडूळगांव</td><td>११९०</td><td>१४,१४,१७३</td></tr>
</table>
यापुर्वी मंहानगरपालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत राबविणेत आलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राबविणेत आलेल्या च-होली, बोऱ्हाडेवाडी, आकुर्डी व पिंपरी प्रकल्पांसाठी निविदा स्वीकृत दरानुसार लाभार्थी हिस्सा निश्चित करणेत आलेला आहे. लाभार्थी हिश्श्यास मा. महापालिका सभेची मान्यता मिळाल्यानंतर नागरिकांकडून अर्ज मागविता येणार आहेत. सबब वरील तक्त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे निविदा स्विकृती नुसार येणारे र.रु.१४,१४,१७३/- ही रक्कम डुडूळगांव प्रकल्पाच्या सदनिकांकरीता लाभार्थी हिस्सा म्हणून निश्चित करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.</td></tr>
<tr><td>निर्णय -</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

सही/-
(चंद्रकांत पोपट इंदलकर)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**